म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चरित्र

संग्रहालय क्रमांक
५०

लेखक

सन
१८८५

पुस्तकाचें नांव आत्मारामबाबा रामदासी यांचा इतिहास

५०

चरित्र

र. नं. १८०९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
नं. ३५८.

॥ श्री[illegible]मसमर्थ ॥

सं. पु. ३६२
२०७९८

१३.

श्रीराम समर्थ.

सद्गुरु

# आत्माराम बावा रामदासी

संस्थान

# ठाकुरद्वार मुंबई यांचा इतिहास.

विद्वान् लोकांचीं मतें घेण्याकरितां

आत्मारामबावांचे नातू हरिबावा

यांच्या सूचनेवरून

आर.जी.अ.स. छा. चे उत्पादक

यांनीं तयार करून

मुंबईंत

जगदीश्वर छापखान्यांत छापविला.

मिती

ज्येष्ठ शुद्ध ११ शके १८१३.



श्रीरामसमर्थ.

# सर्व आर्य जनांस विनंति.

ज्या अर्थी सर्वजीवांपेक्षां मनुष्यजातींत
श्वरानें ज्ञानशक्ति विशेष ठेविली आहे त्या
र्थी मनुष्यमात्राचा मुख्य धर्म हाच सिद्ध
होतो कीं, एकाद्या निरपराधी सज्जनाच्या
रीरास अथवा अंतःकरणास आत्महिताक-
तां कोणी दुःख देऊं लागेल तर आपल्या ज्ञा-
शक्तीप्रमाणें शरीरद्वारा परिश्रम घेऊन त्याच्या
ःखाचें निवारण करावें. कदाचित् इतकी शक्ति
कोणाच्या अंगीं नसेल तर अमुक ठिकाणीं
न्याय किंवा अन्याय झाला आहे इतकें त-
प्रत्येकानें आपलें मत जगतांत प्रसिद्ध कर-
याचें साह्य केलें पाहिजे. त्यांतून सांप्रत तर
र्वांचीं मतें अल्पायासानें सरकारापर्यंत ही पों-
चविण्याकरितां वर्तमानपत्रकर्त्यांनीं जागोजाग
डाच उचलिला आहे. हें सर्व मनांत आणून ए-
मोठ्या शहरांत एका नामांकित श्रीमंत गृह-
नें एका जगद्विख्यात महा सत्पुरुषाचा जो

अत्यंत छळ केला व त्या सत्पुरुषाच्या वं
अद्यापही त्या दुःखाचा जो अनुभव येत अ
त्या बद्दलचा मोठ्या परिश्रमानें मिळविलेला र
तिहास न्यायी व दयाशील सज्जनापुढें ठेवीत अ
परमार्थबुद्धीनें या प्रकरणाचे सर्व अस्सल क
पत्र स्वतः पाहून घेऊन जो प्रकार खरा वाटला
संक्षेपानें दर्शित करित आहें. तरी सर्वांनीं कृपा
आपल्या सवडी प्रमाणें परिश्रम घेऊन या प्र
याचें मनन करावें आणि हा झालेला प्रकार न
अथवा अन्याय आहे या अभिप्रायाचे स्वीयो
कोठें तरी आपल्या सहीनें प्रसिद्ध करून पाठ
ण्यांत यावे. म्हणजे यापासून न्यायाचे भुका
सज्जनाविषयीं दयाळू असे पृथ्वीवर अमुक
क आहेत इतकें समजण्यास तरी उत्तम साध
होईल. किंबहुना असें ही होण्याचा संभव आ
कीं ज्यांच्या हातीं अद्याप न्यायाचा फायदा देण
चें सामर्थ्य आहे त्यांच्या ही दृष्टीपुढें हा विषय स
जाऊं शकेल. अलमिति किं विस्तरेण. हे विज्ञाप्ति.

चैत्रशुद्ध १ शाके १८१३ } आर. जी. अलीबाग स० सद
छापखान्याचे उत्पादक

११८७

॥ श्रीराम समर्थ ॥

# श्रीगुरुआत्माराम महाराज यांच्या वंशाचाइतिहास.

मुंबईत पालवाचा रस्ता म्हणून एक विस्तीर्ण पेठ आहे त्या पेठेंत आत्माराम बावांचें ठाकुरद्वार म्हणून एक संस्थान गर्जत आहे. या संस्थानांत पट्टाभिषिक्त श्रीरामपंचायतनाच्या काळे पाषाणाच्या सुंदर मूर्ति असून मंदिरही पक्कें पाषाणी बांधलेलें आहे व देवा समोर सभामंडपांत आत्मारामबावांच्या समाधीचें काम तर फारच उत्तम आहे. हें संस्थान आत्मारामबावांच्या नांवानें प्रसिद्ध असण्याचें कारण या संस्थानचे मूळ उत्पादक हेच महाराज आहेत. हे महाराज शिरगांव मठांतील रामदास संप्रदायाचे

असून महासत्पुरुषांच्या मालिकें
पनीय होते. यांनीं आपल्या हयातींत
मांतक, अमदाबाद वगैरे ठिकाणीं अ
मूर्तींची स्थापना करून तीं संस्थानें
प्रदायी शिष्यांच्या स्वाधीन केलीं. त
च प्रमाणें सुमारें साठ वर्षांच्या मागें
बईंत येऊन हेंही संस्थान केवळ भि
वरच तयार केलें. आणि शके १७५०
साली भाद्रपदमासीं त्यांत श्रीरामपं
यतनाची स्थापना करून तेथें ब्राह्मण
भोजन, जन्मोत्साहादि अनेक सत्कृ
चालू केलीं. पुढें मोठे मोठे गृहस्थ लो
त्यांचे संप्रदायी होऊन त्यांची शिष्यश
ख्याही बहुत वाढली. याप्रमाणें त्यांच
सदाचरणाचा फारच लौकिक झाल्य
कारणानें ते महाराज स्वतः जरी विशे
खटपटी नव्हते तथापि त्यांचीं सत्कृ

याळण्या करितां वरींच वर्षासनें ही सुरू
झालीं. त्यांपैकीं मुख्य मुख्य येणें प्रमाणें.

२०० श्रीमंत महाराज गायकवाड सर-
कार सेनाखासखेल.

२०० श्रीमंत व्यंकटराव घोरपडे अमी-
रुल उमराव सं० बडोदा.

२०० श्रीमंत महाराज सं० सावंतवाडी
यांजकडून मिठागर.

५० श्रीमंत महाराज आंग्रेसरकार दो-
नखंडी भाताचा आकार.

१०० वे० शा० सं० भाऊ पुराणिक बडो-
द सरकारचे आश्रित.

५० राजमान्य रा० भाऊ सा० काळे सं०
बडोदें.

८००

सदरहू प्रमाणें आठशें रुपयांच्या
तर सालीना सनदाच मिळाल्या. शिवा-

य त्यांचे शेंकडों शिष्य असल्या कारणां- नें शेंकडों रु० संस्थानांत चालत येत असत. व ते महाराज त्या सर्व उत्पन्ना- च्या व्ययं उत्साह ब्राह्मणभोजनादि द्वा- रें केव्हांचे तेव्हां करीत असत. याप्रमा- णं सुमारें सात वर्षे गेल्या नंतर महारा- जांस जरेनें फारच ग्रासलें. कारण त्या वेळीं त्यांचें वय सुमारें ९० वर्षांपर्यंत गे- लें असावें. मग त्यांजला असें वाटूं लाग- लें कीं आपला देहावसानाचा समय थोडे दिवसांवर आला. तेव्हां हें संस्थान आ- पल्या मागें व्यवस्थित चालण्या करितां कोणी तरी सच्छिष्य स्थापन केला पा- हिजे. इतक्यांत पूर्वीची एक गोष्ट अ- शीही स्मरली कीं, मी एकवार बडोद्या- स गेलों होतों. त्यावेळीं श्रीरामभक्त रा- मभाऊ पाटोदेकर राहणार नाशिक यांस

मी उपासना दिली आहे. व त्यांजवर माझें अंतःकरण ही बहुत प्रसन्न होतें. त्या वेळीं रामभाऊंनीं माझ्यांजवळ अशी इच्छा दर्शित केली होती कीं मजला आपल्याजवळच्या ताम्रमय पंचायतनाच्या मूर्ति मिळाव्या. त्यावेळीं प्रसन्न चित्तानें मीही बोललों होतों कीं ज्यास ही आत्मारामना मिळेल त्यास या मूर्ति प्राप्त होतील. मग ईश्वराची योजना कोठें असेल ती खरी. हा सर्व प्रकार आत्माराम महाराजांस स्मरल्याबरोबर फारच आनंद झाला. आणि त्यांनीं रामभाऊंस आणण्या करितां आपल्या प्रेमांतले वेदमूर्ति बाळकृष्ण भटजी काळे यांजला मुंबईहून बडोद्यास तावडतोब रवाना केलें. त्याप्रमाणें ते त्वरेनें गेले ही खरे. पण त्यांजला बडोद्यास राम-

भाऊ भेटले नाहींत. व त्यांजला त्यां-
चा कोठें शोधही लागेना म्हणून ते प-
रत आले. परंतु हा महाराजांचा हेतु पू-
र्ण व्हावा हें ईश्वराच्याच मनांत सबब
एक दिवस महाराजांस रामभाऊंचा
असा पत्ता लागला कीं ते रामनवमीच्चे
उत्साहाकरितां केळवें माहिमास आले
आहेत. असा शोध लागल्या बराबर म-
हाराजांनीं पुनः वेदमूर्ती बाळकृष्ण भ-
टजी यांस माहिमास पाठविलें. परंतु दि-
वसें दिवस प्रकृती जास्त बिघडत चा-
लल्यामुळें आपल्या हातून रामभाऊ
गादीवर बसतील हा भरंवसा पटेना. स-
बब मुंबईंतील श्रीमंत मंडळीपैकीं ल-
क्ष्मणजी हरिश्चंद्रजी ऊर्फ भाऊ रसूल
हे आपल्या प्रेमांतले आहेत असें जा-
णून त्यांजला महाराजांनीं कांहीं सं-

स्थानसंबंधीं अखत्यार लिहून दिला व सनदापत्रें वगैरे कागदही त्यांच्या हवालीं केले. तो लिहून दिलेला अखत्यार केवळ रामभाऊंस गादीवर बसविण्यापुर्ता व त्यांजला लोकरीतीप्रमाणें मदत देण्यापुरताच होता.

भाऊरसूलकडे कामाची सोंपणूक होत आहे तों इतक्यांत वेदमूर्ती बाळकृष्ण भटजी माहिमाहून रामभाऊंस घेऊन आले. मग महाराजांस अत्यंतच आनंद होऊन लागलीच तयारी केली. आणि सर्व शिष्यशाखा बलाऊन शके १७५८ दुर्मुख नाम संवत्सरे आषाढ शुद्ध १५ रोजीं सुमुहूर्तावर रामभाऊ पाठोदेकर यांस गादीवर स्थापन केलें. म्हणजे मठ संप्रदायाप्रमाणें सशास्त्र आपलीं भगवीं वस्त्रें, झोळी, कु-

वडी वगैरे त्यांस दिली. आणि सर्वत्रांस
विदित केलें कीं माझे प्रिय शिष्य राम-
भाऊ यांजला मी आपली गादी दिली
आहे तर यांजला आजपासून माझ्या
स्थानीं मानून संप्रदायानुरूप सर्वांनीं
यांजला मदत द्यावी. याप्रमाणें रामभा-
ऊंचा गादीवर बसण्याचा समारंभ झा-
ल्याबरोबर बाहेर ठिकाणच्या ही मंडळी-
स समजण्याकरितां जागोजाग पत्रेंसु-
द्धां पाठविलीं. त्यांपैकीं बडोदे मुक्कामीं
व्यंकटराव घोरपडे अमीरु उमराव यां-
जकडे एक आषाढ वद्य ७ चें पत्र गेले-
लें अस्सल हातीं आलें त्यांत अशीं
अक्षरें आहेत कीं "येथील समस्त मं-
डळीच्या अनुमतें चिरंजीव रामभाऊस
संस्थान संप्रदायानुरूप दीक्षा देऊन
श्रीराममंदिर स्वाधीन केलें आणि येथी

ल रीतीप्रमाणें कोणी संस्थानास गृह-
स्थ अखत्यारी असावा जाणून तो
भाऊ हरिश्चंद्रजी यांस अखत्यार दि-
ला आहे."

मिळून रामभाऊंस आत्माराम म-
हाराजांनीं जी आपली मालकी दिली
ती गोष्ट सर्वत्र पसरली गेली व त्यापा-
सून समस्त श्रोतृजनांस आनंदच झा-
ला यांत संशय नाहीं. फक्त भाऊ रसू-
ल यांस मात्र तें वैषम्य लागलें असें
लोक दृष्टीस येऊं लागलें. तथापि त्यां-
जला, ही गोष्ट रुचली नसेल व मी के-
लेल्या कृत्यांत भाऊ कांहीं घोटाळा
घालतील हें महाराजांच्या स्वप्नींही
नव्हतें. परंतु आपल्या विषयीं भाऊं-
च्या मनांत आलेला कलंक रामभा-
ऊंनीं जाणून एका वेळीं एकांतांत म-

हाराजांस विनंती केली कीं आपण सं-
स्थानचा अखत्यार भाऊ साहेबांस दि-
ला. पण एका मेणांत दोन सुऱ्या क-
शा राहतील. त्यावेळीं तर महाराजां-
नीं रामभाऊंस सांगितलें कीं भाऊक-
डून तुजला तिळभरही त्रास होणार
नाहीं. असें त्यावेळीं बोलले खरे पण
भाऊंच्या वर्तनांत फेर पडत चालल्या-
चें त्यांच्याही दृष्टीस आल्यावरून सं-
शय आला आणि एक दिवस राजश्री
बाबा बाके यांस भाऊ रसूलकडे पाठ-
वून कळविलें कीं संस्थानांत आतां
रामभाऊ स्थापन झाले आहेत ते-
व्हां पूर्वीं आपणाकडे दिलेल्या सोंप-
पूकीचा कार्यभाग झाला हें जाणून
संस्थानच्या सनदा वगैरे कागदपत्र जे
आपणापाशीं दिले आहेत ते संस्था-

नांत राहण्याकरितां पाठवावे. या महाराजांच्या निरोपास भाऊ नाहीं तर म्हणत ना पण उद्यां देतों, परवां देतों अशा प्रकारें चालवून भाऊ रसूलनी कागद बाहेर काढले नाहींत. तरी ही आत्माराम महाराजांचें मन स्वच्छ असल्यामुळें भाऊ रसूल पासून पुढें आपल्या वंशाचा समूल घात होईल इतकें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. आणि दिवसें दिवस प्रकृतिही जास्त बिघडत चालल्यामुळें त्यांचें लक्ष्य सर्व परलोक साधनाकडे लागलें. अखेरीस फार यातना होऊं लागल्या म्हणून श्रावण वद्य ५ साल मजकूर रोजीं महाराजांनीं चतुर्थाश्रम घेतला आणि तिसऱ्याच दिवशीं म्हणजे श्रावण वद्य ७ सच समाधिस्थ झाले. हा महाराजां-

चा वियोग रामभाऊंस तर शोकप्रद होईलच कारण त्यांचें तें एक छत्रच होतें पण संस्थानच्या सर्व शिष्यवर्गा स ही तें दुःख फारच दुःसह झालें त- थापि रामभाऊ संस्थानास मालक झाल्याकारणानें व त्यांचा स्वभावही लोकप्रिय तसाच खर्चीक असा मंड- ळीच्या दृष्टीस आल्यावरून मंडळींनीं मनाचें समाधान करून घेतलें. आणि रामभाऊंनीही पुढें धैर्य धरून महारा- जांचें उत्तरकार्य फारच थाटानें केलें, इ- तकेंच नव्हे तर संस्थानचीं नित्य नैमि- त्तिक कृत्यें अगदीं पूर्वीप्रमाणें चालू ठेविलीं.

याप्रमाणें एक वर्षपर्यंत निर्विघ्नपणा- नें काम चालल्या नंतर भाऊ रसूलनीं कलहास आरंभ केला. म्हणजे प्रथम

त्यांनी रामभाऊंपाशीं संस्थानच्या जमाखर्चाचा हिशेब मागीतला. रामभाऊ म्हणाले कीं तुह्मी हिशेब कोणत्या संबंधानें मागतां? ते म्हणाले, आह्माला आत्मारामबावांनीं अखत्यार दिला आहे, त्या संबंधानें मागतों. रामभाऊ म्हणाले आपणास अखत्यार कोणता व कशाकरितां दिला आहे हें सर्व आम्हास माहित आहे. आमच्या कडून हुकुमतीनें हिशेब देणें व्हावयाचें नाहीं. कदाचित् तुम्ही संस्थानचे शिष्य म्हणून पाहणार असलेत तर सुखरूप पहा. हें ऐकून भाऊ रसूल यांनीं प्रश्न केला कीं, तुह्माला आमच्या आज्ञेनें चालणें आहे कीं नाहीं. रामभाऊंनीं साफ सांगितलें कीं आमच्या संस्थानचाच संप्रदाय दुसऱ्याचा हुकूम उठवण्याचा

नाहीं. हे शब्द कांनीं आल्यापासून भाऊ रसूल यांनीं रामभाऊंपाशीं प्रसिद्धपणें द्वेष चालविण्याचें काम सुरू केलें. व रामभाऊंचा पाडाव करण्याकरितां अनेक तऱ्हा चालू केल्या.

परंतु तीं सर्व कृत्यें त्यांचीं निर्विघ्न चाललीं. याचें कारण ते श्रीमंतीच्या व अधिकाराच्या संबंधानें मोठ्याच योग्यतेस चढलेले असल्यामुळें त्यांच्या आंगीं कर्तुमकर्तुं समर्थता होती. व ते जें करतील अथवा बोलतील तें सर्वमान्य होत होतें. इतक्यांत शके १७६० सालचा रामनवमीचा उत्साह आला तेव्हां भाऊ रसूलनीं रामभाऊंस सांगून पाठविलें कीं रामनवमीचा उत्साह आम्ही करूं आपणास तिकडे पाहण्याचें कारण नाहीं. हें ऐकिल्याबरोबर त्या दिवसा-

पासून रामभाऊ आपणास आत्माराम बावांकडून मिळालेल्या ताम्रमय श्रीरामपंचायतनांच्या मूर्तींचा वर्षाप्रमाणेंच जन्मोत्साह वेगळा करूं लागले.

भाऊ रसूल यांनीं उत्साहाचें काम पतकरलें परंतु सदर उत्साह भिक्षेवरच चालत असे म्हणून मंदिरचे पुजारी तात्याभट गणपुले यांजला भाऊ रसूल यांनीं भिक्षेस पाठविलें. आत्माराम बावांच्या शिष्यवर्गांना ही गोष्ट नापसंतच होती सबब कित्येकांनीं तर पुजाऱ्यांस स्पष्टच जबाब दिला कीं भाऊ रसूल हे जर आत्मारामबावांचे चिरंजीव बनले असतील तर त्यांनीं स्वतः झोळी घेऊन बाहेर पडावें म्हणजे भिक्षा घालण्याचा विचार करूं. मिळून भाऊचे कोणी आप्त मित्र असतील त्या-

नीं कांहीं घुजान्यास दिलें असेल पं
तु सर्वांनीं रामभाऊंचाच सत्कार करून
त्यांच्या उत्साहासच मदत दिली.

एकंदरींत रामभाऊंच्या महत्वांत
कांहीं कमी पडेना आणि आपल्या
हातून संस्थान जमेना म्हणून भाऊ
रसूल अत्यंत चिंताक्रांत झाले. तथा
पि अभिमान सुटेना सबब एक दिवस
त्यांनीं असा विचार केला कीं, येथें
एक रामदासीच आणून ठेवावा म्हणजे
संस्थान चांगलें चालेल. बहुधा आ-
त्माराम महाराजांच्या शिष्यवर्गापैकीं
च मिळेल तर फार चांगलें. इतक्यांत
स्मरण झालें कीं अमदाबाद येथें भ-
द्रेंत एक आत्मारामबावांचेंच मंदिर
आहे त्या संस्थानांतही एक गोविंद
बावा या नांवाचे शिष्य आहेत. तेव्हां

त्यांजलाच बोलावून घ्यावें म्हणजे आ-
पला पूर्ण कार्यभाग साधेल. हें सुचल्या
बरोबर लागलेंच त्यांजला पत्र लिहून
आणिलें आणि प्रथम बडोद्यास पाठवू-
न वर्षासनें आपणास मिळण्या विषयीं
खटपट चालविली. हें ऐकून रामभाऊ-
नीही आपले कारकून दिनकर बाबाजी
पाटणकर यांस बडोद्यास पाठविलें. ते-
व्हां उभयतांचा तेथें झगडा चालला. त्यां-
त गोविंदबावा यांनीं आत्मारामबावांकडू-
न भाऊ रसूल यांस मिळालेलें अख-
त्यारपत्र दाखविलें. व भाऊ रसूलच्या
आज्ञेनें मी मंदिरांत स्थापन झालों आ-
हें वगैरे सांगितलें. दिनकर बाबाजी
यांनीं विदित केलें कीं भाऊ रसूल यां-
स दिलेला अधिकार केवल रामभाऊंस
गादीवर बसविण्या पुरता व त्यांजला म-

दत देण्यापुरताच होता तेव्हां या अ-स्वत्यारानें आत्मारामबावांनीं रामभाऊस स्वतः दिलेली मालकी दूर कशी होईल? त्यांतून रामभाऊंची गादीवर स्थापना यथाशास्त्र झाली आहे. तस्मात् ते महाराजांचे साक्षात् पुत्रच समजलें पाहिजे.

सारांश बडोद्यास मोठा बखेडा पडून कांहीं दिवस वर्षासनें मुळींच अनामत राहिलीं आणि तेथें सर्वानुमतें असें ठरलें कीं रा. रा. बाळाजीपंत दादा यांच्या मार्फत श्रीमंत जगन्नाथ ऊर्फ नाना शंकर शेट यांजला पत्र पाठवावें. आणि त्यांचें लिहून येईल त्यांस वर्षासनें द्यावीं. याप्रमाणें विचार होऊन त्यांजकडे पत्र आल्यानंतर ठाकुरद्वारांत मोठी सभा होऊन सर्वांचा विचार असा झाला

कीं रामभाऊ यांस आत्माराम महाराजांनीं संप्रदायानुरूप संस्थानीं स्थापित केलें आहे. तेव्हां रामभाऊंच्या विरुद्ध कोणी चालल्यास तें अयोग्य समजलें पाहिजे. या सभासदांच्या आशयाचीं वे. शा. सं. बाळशास्त्री जांभेकर यांजकडून जागोजाग पत्रें ही रवाना झालीं त्याच प्रमाणें बाळाजी पंत दादा यांच्या मार्फत नाना शंकर शेट यांजकडूनही बडोद्यास लिहून गेलें. त्यावरून संवत् १९०३ सालापर्यंत एकंदर पडलेला सर्व बखेडा मोडून श्रीमंत रावसाहेब गोपाळराव मेराळ यांजकडून असा ठराव झाला कीं, ज्या अर्थी रामभाऊ यांजला आत्माराम बाबानीं आपल्या गादीवर स्वतः स्थापित केलें आहे त्या अर्थी त्यांजलाच वर्षासनें द्यावीं. असा निश्चय झा-

त्या वरोबर संवत् १९०४ सालापासून
वर्षासनें रामभाऊंकडे येऊं लागलीं.

सारांश-असा प्रकार झाल्यानंत
कोणीकडूनही रामभाऊंचा पाडाव क
ण्याच्या कामीं भाऊ रसूलचा उपाय च
लेना तेव्हां मग जागोजाग रामभाऊंच्य
निंदा करण्यास आरंभ केला. कोठेंही ब
सलें तरी बुध्या रामभाऊंच्या गोष्टी का
ढून त्यांच्या घरीं स्त्रिया फार जमत अ
सतात. वगैरे वल्गना कराव्या व राम-
भाऊ देवळाच्या बाजूसच होते सबब
अनेक प्रकारें हरएक कामांत त्यांजला
छळीत जावें त्यामुळें एक दिवस रामभा
ऊंस अशी उदासी आली कीं अशा
त्रासांत राहण्यापेक्षां आपण महायात्रे
स जावें. हें बरें. मनांत आल्याबरोबर सं
स्थानांतून तर तत्काल निघाले; पण

यात्रेच्या खर्चाची कांहीं सोय झाली पाहिजे म्हणून सांबदेवीस हरिश्चंद्र यादवजी यांच्या धर्मशाळेंत मुकाम केला. व दासनवमीचा उत्साह ही तेथेंच झाला. गावांत बातमी दाट फुटली कीं रामभाऊ भाऊरसूलच्या आसानें निघून गेले. मग काय विचारावें. त्यांच्या सर्व शिष्यमंडळांत कल्होळ होऊन जिकडे तिकडे बोलूं लागले कीं भाऊरसूल यांनीं मोठेपणास चढून अखेरीस चांगलेंच यश संपादन केलें. व आत्मारामबावांनीं यांजवर प्रेम ठेविलें, त्याचें तर आज पूर्णच सार्थक झालें. विद्वान् लोकही उघड बोलूं लागले कीं काय हो! "राज्ञः प्रमत्तस्य नृगस्य शापतो द्विजस्य तिर्यक्त्वमथाह राघवः" असें रामगीतेंत आहे त्या मानावरून

म्हणजे लक्षावधी गोप्रदानें करणारा नृगराजा महान् पुण्यवान् असतां पूर्वी दान दिल्या पैकीं एकादि गाय पुन्हा दा नांत आली आहे कीं काय इतकेंच पा हण्याच्या कामीं त्याचा प्रमत्तपणा झाल्याकारणानें जर त्याजला सर ड्याचें जन्म प्राप्त झालें, तर या गुरु द्रोहानें, मित्रद्वेषानें, विश्वासघातानें व वृत्तिच्छेदानें भाऊ रसूल यांची द शा काय होणार? हे शब्द भाऊ रसू ल यांच्याही कानीं आल्याबरोबर त्यां जलाही भीति उत्पन्न झाली कीं हे रा मभाऊ यात्रेस गेले तर माझ्या क पाळीं खरोखर अपयशाचा डाग ला गणार. हें मनांत आणून आपला म लब नर न सोडितां रामभाऊंकडे बा वा बाक्के यांच्या मार्फत एक पत्र लिहून

पाठविलें कीं आपण महायात्रेस जा-
ण्याचें करूं नये. आत्माराम बावांच्या
मागें जरीं आपणामध्यें परस्पर कांहीं
वैषम्य आलें असलें तरी तें समोरास-
मोर होतें. आतां आपण गेल्यानें आ-
म्हांस बरें वाटणार नाहीं. त्यांतून उ-
त्साहही नजीक आला आहे. तो तुम-
च्या आमच्या समक्ष झाला पाहिजे.
(तें फाल्गुन वद्य १३ चें पत्र पुराव्या करि-
तां अद्याप कायम आहे.) सदर पत्र रा-
मभाऊंनीं वाचून तसेंच ठेविलें. दुसरें
राघोबा तात्या यांच्या मार्फत गेलें.
त्याचेंही रामभाऊंनीं उत्तर दिलें नाहीं.
कारण यात्रेचा बेत रहित करून पूर्व-
स्थितींत कांहीं बदल होण्या सारखा
त्या पत्रांतून अर्थ निघत नव्हता. शे-
वटीं रामभाऊ काशियात्रेस स्वारस जा-

पार हें भाऊ रसूल यांस समजल्याव
रून अपकीर्तीच्या भीतीनें वे. शा. सं
गाधरशास्त्री फडके व काशिनाथ मो
जी या उभयतांस बरोबर घेऊन ते फा
ल्गुन वद्य ३० रोजीं प्रातःकाळीं स्वतः
गांवदेवीस गेले. आणि मोठें प्रेम दा
वून रामभाऊंस विनंति केली कीं तुम
आमचा मध्यंतरीं जो कांहीं भिन्नभा
राहिला तो होणाऱ्या भवितव्याप्रमाणें
होऊन गेला. आतां झालेली गोष्ट त
माघारी येत नाहीं. पण अतःपर आप
पांत विषमभाव राहणार नाहीं. तुम्ही
परत येऊन आपलें संस्थान संभाळावें
आमच्याजवळ महाराजांनीं सनदा व
जे कागदपत्र दिले आहेत ते सर्व शोध
आपणाकडे पाठवितों. पण आपण
काशीस नजातां संस्थानीं परत येत

असें वचन द्या म्हणजे मी स्वस्थ होईन. शेवटीं रामभाऊंनी मोठ्याच्या वचनावर भरंवसा ठेवून घरीं परत येण्याचा विचार केला. इतक्यांत नाना शंकर शेट यांची ही स्वारी गेली त्यांचा तर रामभाऊंवर अंतर्बाह्यच शुद्धभाव होता त्यांनी ही सांगीतलें कीं आपण संस्थान सोडून जाऊं नये. पुढें होईल तसें पाहतां येईल. त्यांतून आज भाऊनींहि आपणापाशीं कलह न करण्याचें वचन दिलें आहे. हें एक बरेंच साधन झालें आहे. याप्रमाणें दोन्ही गृहस्थांच्या मनाचा कल पाहून व आत्माराम महाराजांचा हेतु पूर्ण करणें हाच आपला मुख्य स्वधर्म आहे हें जाणून सर्व कुटुंबासह त्याच दिवशीं सायंकाळीं संस्थानीं परत आले. नंतर त्या

वर्षीचा उत्साह एक विचारामुळें फार-
च मौजेचा झाला. त्या दिवसापासून
भाऊ रसूल यांनीं बरेच दिवस रामभा-
ऊंच्या विरुद्ध खटपट चालविण्याची बंद
ठेविली असल्या कारणानें रामभाऊंनीं
ही शिष्यवर्गांत खटपट करून सार्वज-
निक भिक्षाद्रव्यानें देवाचा सभामंडप
आत्माराम बावांची समाधी. देवालया-
च्या मागील चाळ हीं कामें तयार के-
लीं. सदर कामें तयार करणारे कारा-
गीर ही अद्याप विद्यमान आहेत.

नंतर शके १७७४ च्या ज्येष्ठ महिन्यां-
त रामभाऊंची अकस्मात् प्रकृति बि-
घडली व ती बरी होण्याचीं चिन्हेही
दिसत ना. त्यावेळीं संस्थानचें सर्व ल-
हान मोठें शिष्यमंडळ रामभाऊंच्या भे-
टीस येऊं लागलें. परंतु भाऊ रसूल मा-

त्र येतना. हें जाणून रामभाऊंनीं भाऊरसूलकडे धोंडभटजी माडखोल्कर प्रभुमंडळीचे उपाध्याय यांस पाठवून कळविलें कीं आपण माझी प्रकृति फार बिघडली असून भेटीस येत नाहीं व आमच्या संस्थानचे दस्ता ऐवजी कागदही पाठवीत नाहीं. याचें कारण मनोमय साक्षित्वानें मीही समजलों. पण माझ्या पश्चात् माझ्या चिरंजिवाचा आपण छळ चालवाल तर हें शुद्ध स्त्रीकार्य आहे. आपल्या मनांत माझें कांहीं नुकसान करणें असेल, तर त्याचा स्फोट माझ्या समोरच व्हावा. मागाहून मला काळजी नको. असें कळविलें तथापि ते आले नाहींत; इतकेंच नव्हे तर ठाकुरद्वारीं दत्तजयंतीचा उत्साह भाऊ रसूलकडूनच होत असे त्या

करितां ते मार्गशीर्षपौर्णिमेस मंदिरां-
त आले असून व त्यावेळीं ही रामभा-
ऊंनीं बलाविलें तथापि त्यांच्या भेटीस
आले नाहींत. शेवटीं कालनियमाप्रमा-
णें शके मजकुरीं मार्गशीर्ष वद्य १३ रो-
जीं रामभाऊ परलोकवासी झाले. ते-
व्हां आत्माराम महाराजांच्या निर्याणा-
च्या वेळेस जो दुःखप्रसंग रामभाऊंवर
गुदरला तोच यावेळीं त्यांचे पुत्र हरी
बावा यांजवर आला. हरीबावांचें त्या-
वेळीं वय सुमारें २२ वर्षांचें होतें. व
रामभाऊंचें निर्याणसमयीं वय सुमारें ४१
वर्षांचें होतें.

हरिबावांनीं गंभीर अंतःकरणानें वडि-
लाचें उत्तर कार्य वगैरे संप्रदायाप्रमाणें सु-
रू केलें. पण भाऊ रसूल यांचे संस्था-
नसंबंधानें साम दान भेद दंड रामभाऊं-

ऱ्या गतदिवसापासूनच सुरू झाले. म्हणजे रामभाऊंच्या दाहकालीं भाऊ रसूलच्या प्रेमांतले गोपाळ शास्त्री स्वर्गे आणि धोंडभट माडखोळकर हे आले होते, ते हरिबावांस त्या वेळेसच बोलले कीं बावासाहेब, आपण रामभाऊ गेल्याचें अणुमात्र दुःख करूं नये आपणास भाऊ रसूल आहेतच त्यांच्या विचारें आपण वागत जाऊन आनंदानें दिवस न्यावे. हरिबावांनीं त्यावेळीं उत्तर दिलें नाहीं. म्हणून त्या दोघांनीं रोज हरिबावांस, येऊन उपदेश करावा, कीं तुम्ही भाऊ साहेबांच्या विचारानें वागलां म्हणजे तुह्मास कोणतेंच न्यून पडणार नाहीं. परंतु हरिबावांनीं उत्तर देण्याचें मुळींच बंद केलें होतें. शेवटीं भाऊ रसूल एकदा स्वतःही त्या उभयतांबराबर आले आ-

णि मोठ्या वडीलपणाचा देखावा दाखवू
न समोर बसल्यानंतर शास्त्रीबावा बोल
ले कीं, बावा साहेब, रामभाऊ गेले अस
आपणास म्हणण्याचें मुळींच कारण
नाहीं. देवळांत राम आणि हे भाऊ मि
ळून आपले रामभाऊ कायमच आहेत.
त्यावरही हरिबावांनीं उत्तर दिलें नाहीं.
आणि ती उत्तर देण्याची वेळ ही नव्हती
सारांश तेरा दिवस पर्यंत प्रसंगा प्रसं
गानें त्यांचा सारखा उद्योग चालू होता
परंतु हरीबावांकडून उत्तर मिळालें नाहीं,
म्हणून भाऊसाहेबाच्या मनांत खुटखुट
तच होतें. चवदावा दिवस उगवल्याबरो
बर आमच्या आज्ञेनें हे वागतील किंवा
नाहीं याची चांचणी पाहण्या करितां
भाऊंनीं पूर्वी एक हुकूम पाठविला कीं
आपल्या मंदिरांत पूर्वीं तात्या भटगण

पुळे या नांवाचे जे पुजारी होते त्यांज-
ला रामभाऊंनीं काढलें होतें. पण आ-
पण त्यांजला पूर्ववत् कायम करावें. ह-
रिबावांनीं नम्रपणानींच सांगून पाठविलें
कीं आपण जर रामभाऊंच्या प्रेमांतले
म्हणविता तर त्यांनीं केलेल्या गोष्टींचा
अभिमान आपणास असलाच पाहिजे.
व त्यांजला ज्या प्रियाप्रिय गोष्टी होत्या
त्या आपणास तशा झाल्याच पाहिजे-
त. आपली वागणूक तशी ठेवण्याचा
आपला अखत्यार आहे पण माझ्या
हातून तर वडिलांच्या कृत्यांचें उल्लंघन
होणार नाहीं. हा निरोप भाऊ साहेबांनीं
ऐकिल्याबराबर रागानें पुन्हा वरील दोन
गृहस्थांस बोलावून त्यांजला सांगितलें
कीं तुम्ही आज हरिबावांकडे जावें आ-
णि आम्ही, तुमच्या विचारें वागत जाऊं

असें हरिबाचांपासून लेखी लिहून आ णावें. ते दोघे आल्यावर त्यांनीं भाऊ- साहेबांचा निरोप दर्शित करितांच हरि बावांनीं सांगितलें कीं भाऊ साहेबांपा- शीं आत्मारामबावांचाच लेख आहे अ- सें ते म्हणतात मग माझ्या लेखाचें का- रण काय? मजला आणखी लिहून दे- ण्याचें कारण कांहींच दिसत नाहीं. हाही निरोप त्या उभयतांनीं सांगितल्यावर भा- ऊंच्या मनांत पक्कें वाटलें कीं हे हरिबा- वाही आम्हास रामभाऊ प्रमाणेंच जड होणार. आपला हुकूम संस्थानावर रा- हीलसा वाटत नाहीं. हरिबावांनीं त्यां- च्या राजीनाराजीकडे विशेष लक्ष्य न पु- रवितां माघमासांत दासनवमीचा व चै- त्रांत रामनवमीचा असे पूर्व संप्रदायाप्र- माणें उत्तम प्रकारें उत्साह केले. पुढें ए-

क दिवस आह्मास दत्ताच्या मूर्ति ब-
सविण्याचा विचार करणें आहे असें
निमित्त प्रसिद्ध करून भाऊंनीं आपले
घरीं सर्व ब्रम्हवृंद बोलाविलें. आणि गं-
गाधर शास्त्री फडके प्रभृतींचे पूर्वीं ए-
कांतीं कान भरून त्यांजला सांगितलें
कीं, तुम्ही हरिबावांस येथें बोलावून
त्यांजला समजूत द्या आणि आमचे वि-
चारें ते वर्ततील असें करा. नाहीं तर
त्यांचें खचित नुकसान होईल. कशाही
प्रयत्नानें हरिबावांकडून आज मजला
लेख लिहून देववा. शास्त्रीबावांनीं ब-
हुधा विडा उचलूनच हरिबावांस त्या स-
भेंत बलावणें पाठविलें. हरिबावांच्या म-
नांत जावयाचें नव्हतेंच पण उन्मत्तपणा
दिसतो म्हणून गेले. जाऊन बसल्याव-
रोबर भाऊ साहेबांच्या सूचनेप्रमाणें गं-

गाधर शास्त्रीबावांचा प्रथम हाच प्रश्न कीं संस्थानच्या संबंधानें भाऊसाहेब सांगतात तसें तुम्हीं लिहून कां देत नाहीं. हरिबावांचें एकच उत्तर कीं आत्माराम बावांचा लेख आहे म्हणता मग माझ्या लेखाचें काम काय. शास्त्रीबावांनीं पुन्हा सांगितलें कीं हरिबावा, आपल्या कल्याणाची आम्हास इच्छा आहे. म्हणून हात जोडून मागणें मागतों कीं भाऊसाहेब आपले हितचिंतक समजून ते मागतील तसें लिहून द्या. आणि त्यांच्या आज्ञेनें वर्तजा. हरिबावा सर्व ऐकून बोलले कीं आपण जें कराल तें सर्व माझ्या हिताचेंच कराल पण मागतील तसें लिहून देण्यानें जर माझें नुकसान नाहीं असा आपण उपदेश करितां तर जगन्नाथ शंकर शेट यांजपासून

ही त्यांची इष्टेट मला लिहून देववा. त्यांनीं मला लिहून दिली तर मी हि भाऊंस लिहून देईन. तें वर्मी बोलणें पडल्या बरोबर शास्त्रीबावा चिडले. आणि मग अद्वा तद्वा बोलूं लागले कीं अशा गुणांनीं तुमच्या हातीं नरोटी येईल. अशा प्रकारें त्यांच्या तोंडांतून बरींच दुर्वाक्यें निघालीं तरी हरीबावा क्रोधवश झाले नाहींत. शांतपणानें त्यांनीं इतकें मात्र सांगितलें कीं शास्त्रीबावा, आपण मला ही क्रोध करा पण माझी एकवार हकीगत ऐकून तरी घ्या. शास्त्रीबावा म्हणाले बरें बोलाबोला. निघूंद्या एकदा कायतें. हरीबावा म्हणाले, शास्त्रीबावा माझी स्वतःची इच्छा विचाराल तर माझ्या मनांत एक अक्षर सुद्धां भाऊंस लिहून द्यावें असें येत

नाहीं. कारण भाऊसाहेबांनीं फार दि-
संपासून आमच्यापाशीं दीर्घद्वेष-
चालविला आहे तथापि जर तुमचा स-
र्व ब्रम्हवृंदांचा मजवर कोपत्व होत अस-
ल तर मी थोडें लिहून देईन. पण भा-
साहेबांनीं ही माझें कांहीं कबूल केलें
पाहिजे. मग शास्त्रीबावांस जरा बरें वा-
टून त्यांनीं भाऊ रसूल यांस सभेंत ब-
लावून सांगितलें कीं, भाऊ साहेब है
हरिबावा काय म्हणतात तें ऐका. हरि
बावा म्हणाले मला जें सांगणें तें मी
त्यांस एकांतांत सांगेन. हें ऐकतांच
भाऊसाहेब हरिबावांस घेऊन एकांतां
त गेले. तेथें हंसत हंसत हरिबावा म्ह-
णाले कीं आज आपण युक्ति चांगली
काढली. सर्व ब्राम्हण आपल्याकडील
झाले म्हणजे मजला मागाल तसें लि-

हून देणेंच भाग आहे. पण आपण मज-
पाशींआतां काय लिहून मागता तें मा-
त्रे एकवार स्वतः सांगा. तें म्हणाले कीं
संस्थान तुमचें आहे. व त्या संबंधीं
सर्व उत्पन्न तुह्मास देत जाऊं. आणि
तुम्ही कराल तें आह्मास मान्य होत
जाईल, असें स्पष्ट लिहून द्या.

हे शब्द ऐकिल्याबराबर हरिबावांस
धाईट वाटून पुन्हां बोलले कीं भाऊ
साहेब? आत्मारामबावांनीं लिहून दि-
लें आहे ह्मणता मग माझ्या लेखाचें
महत्व काय. आपला माझा आप-
सांत द्वेष उत्पन्न न होईल अशी आ-
पण तजवीज ठेवा. म्हणजे झालें. या
बोलण्यावर तर फारच क्रोधाविष्ट होऊ-
न भाऊ बोलले कीं असल्या पोरचे-
ष्टा उपयोगी नाहींत. सांगतों तसें लि-

हून देणें असेल तर बसा. नाहीं तर घ. रीं जा. हें त्याचे बोलणें फारच चिडीस यावयाचें; परंतु हरिबावांनीं समय पाहून आग्रहाची थोडी माघार घेतली. आणि पुन्हा ते म्हणाले कीं भाऊ साहेब, आपणास राग येत असेल तर मी श्रीराममंदिराच्या संबंधानें म्हणाल तसें लिहून देतों परंतु आत्मारामबाबांची समाधि, चाळी वगैरे इष्टेट आणि भिक्षा वगैरेची मिळकत; तसीच पूर्व संपादित चीज वस्त, कावेरीबाईनीं रामभाऊंस बक्षीस दिलेली जागा व रामभाऊंनीं बांधलेला सभामंडप याचा मात्र त्या लेखांत संबंध नसावा. भाऊंचा आग्रह तर शिखरासच चढलेला होता ते तसें तरी कोठून ऐकतात. लागलेच म्हणाले कीं जें उत्पन्न होईल तें तुमचें. तुम्ही

सांगाल तसा खर्च करीत जाऊं. तुमच्या आज्ञेबाहेर वर्तन करणार नाहीं. करीन तर तुम्ही सांगाल त्या शिक्षेस पात्र होईन. असेंच लिहून दिलें पाहिजे. अखेरीस हरिबावा म्हणाले कीं चाळीवर तरी माझी सत्ता आहे कीं नाहीं. भाऊ म्हणाले चाळींतील एका खोलीवर सुद्धां तुमची सत्ता राहणार नाहीं यापुढें तुम्ही काय म्हणतां ? इतकें बोलणें चाललें असतां इतक्यांत सभेंतून फडके शास्त्रीबावांचा निरोप आला कीं, तुमचा एकांत लांबला; पण आमच्या अंताची वेळ आली. तर आतां तरी पुरे करा. शेवटीं भाऊ हरिबावांस म्हणाले, एकच जबाब सांगा. तुम्ही लिहून देता कीं नाहीं ? हरिबावा म्हणाले ज्या अर्थीं आपल्या मनांत विपरीत भाव आहे

त्या अर्थी मी एक अक्षर सुद्धां लि-
हून देणार नाहीं. मग जें प्रारब्धीं अ-
सेल तें होईल. अखेरीस भाऊसाहेब
रागावले आणि सभा विसर्जन झाली.
हा समारंभ शके १७७५ श्रावणवद्य ६
रोजीं झाला. व त्या सभेंत असणाऱ्या
मंडळी पैकीं हरिभक्त विनायक बावा सा-
तारकर हे अद्याप विद्यमान आहेत. नं-
तर दुसऱ्याच दिवशीं आत्माराम बावां-
ची पुण्यतिथि आली त्या दिवशीं भाऊ
रसूल यांनीं भुध्या हटानें त्रिंबक बावा
नाशिककर यांचें कीर्तन केलें. आराध-
ना मात्र हरिबावांच्या हातानें झाली.
त्या दिवसापासून हें प्रकरण फारच
पेटत जाऊन भाऊसाहेब यांनीं सर्वसा-
[illegible] तयारी करून सुप्रीम कोर्टांत
[illegible] केली कीं हें संस्थान आमचें

असून व आमची येथें वहिवाटही चालू असतां आम्ही संस्थानांत नेमलेल्या पुजाऱ्यांपैकीं हरिबाबा हे आमच्या विचारें वागत नाहींत सबब यांजला काढण्याचा हुकूम व्हावा. त्यावरून हरिबावांस समानही लागलें. तेव्हां हरिबावांच्या मनास विरक्ति होऊन त्यांनीं असें ठरविलें कीं हें संस्थान ही नको आणि हा त्रासही नको. कोठें तरी स्थलांतरच करून रहावें. असा मनाचा निश्चय करीत आहेत तों असेंही सुचलें कीं एकवार नाना शंकर शेट यांजला तरी हा मजकूर कळवावा. मनांत आल्याबरोबर त्यांजकडे गेले व तें समान पुढें ठेऊन मी आतां संस्थानांतून निघून जातों, वगैरे त्यांजला श्रुत केलें. नानाशेट मोठे विचारी. व यांच्यापाशीं निष्कपट वागणारे

होते सबब त्यांनीं सांगितलें कीं संस्था
नांतून निघण्याची एकदम उतावळी करं
नका. संस्थान जमविण्यास फार दिवस
लागतात. आपले वडील रामभाऊ यां
जलाच कष्ट किती लागलेते आम्हास
ठावूक आहेत. आतां सरकार दिवाणी-
चा प्रसंग येणार खरा पण येऊं द्या. मी
तुमची सर्व व्यवस्था लाऊन देतों. मग
शिवदास मोहनजी आणि मोरोबा दामोद-
रजी याकर आणि वोन वकील यांचे कु
र्क या उभयतांस त्यांनीं बोलाऊन सां-
गीतलें कीं तुह्मी या हरिबावांची नीट के
स पाहून ती काळजीनें चालवा. पुढें
केस चालूही झाली. पण हरिबावांचा
कारखाना रामदासी. रोज वकीलांकडे
जातो कोण आणि त्यांजला कमीजा-
स्त पुरावा काय पाहिजे तो विचारतो की

ण. त्यांतून भाऊ रसूल यांचे सर्व स्ने-
हीच. मुकद्दमा निघाला तेव्हां हरिबावां-
च्या जबानीच्या वेळेस त्यांजला जज्जां-
चा इतकाच प्रश्न झाला कीं तुम्हीं भाऊ-
रसूल यांस लिहून देता किंवा नाहीं? ह-
रिबावा म्हणाले नाहीं. इतक्याच जबानी-
वर इंग्रजीभाषेंत कोर्टांत कांहीं चर्चा हो-
ऊन भाऊरसूलच्या तर्फे निवाडा झाला.
मग भाऊंनीं कोणते दस्तऐवज पुराव्या-
स पुढें केले आणि जज्जांचें मन आप-
णाकडे कसें वळविलें तें ईश्वरासच ठा-
ऊक. भाऊ रसूल यांनीं एकदम एकस-
रकारी मनुष्य देवळांत आणून हरिबा-
वांस देवळांतून काढून दिले. पुढें याबद्द-
ल अपील करतो कोण? आणि निवा-
ड्याचें कागदपत्र पाहतो कोण? हरिबा-
वांनीं त्या दिवसापासून त्या संस्थानचें

मुळींच नांव सोडून देवळाच्या बाजूस जी त्यांची पित्रार्जित चाळ होती त्यांत ते जाऊन राहिले. आणि विद्यार्थीमंडळापैकीं जे सच्छिष्य होते त्यांजपासून भिक्षा द्रव्य मिळवून युक्तिप्रयुक्तीनें नवीन मंदिर ही बांधून पूर्ववत् संस्थान संप्रदायाप्रमाणें पूजा नैवेद्य उत्साह, ब्राम्हणभोजनादि सर्व कृत्यें चालवूं लागले. ही गोष्ट सुमारें शके १७७५ ची असावी.

आतां हे हरिबाबा सांप्रत कायम असल्यामुळें यांचें कांहीं वर्णन करणें म्हणजे थोडी मुखस्तुति दिसेल खरी. पण सद्वृत्तशाली पुरुषास यथाशक्ति मदत करावी असें कोणा वाचकाच्या मनांत आलें तर त्यांजला त्यांची योग्यता कळावी म्हणून थोडा त्यांचा ही

इतिहास लिहितों. हे चाळ्शींत आल्यास सुमारें सत्तीस (३७) वर्षें झालीं. त्यावेळीं यांजवळ द्रव्यसंग्रह मुळींच नव्हता. पण त्यांनीं धीर न सोडितां हळू हळू राममंदिर हीं पक्कें बांधून देवाच्या राजोपचाराचें सर्व सामान घरचें तयार केलें. व प्रतिवर्षीं ते रामनवमीचा उत्साह दहा दिवस फारच डौलदार करित असतात. खेरीज मध्यंतरीं आत्मारामबावांची पुण्यतिथि व दासनवमी हे तीन तीन दिवसाचे उत्साह आहेत. व. सारांश या सततीस वर्षांत त्यांच्या हातानें हजारों रुपयांचीं सत्कृत्यें घडलीं. यांच्या वचनाची अशी ख्याति आहे कीं, हे जें तोंडानें कबूल करतील तें रजिष्टरापेक्षां ही जास्त किंमतीचें लोक समजतात. आचरणाच्या कामीं तर को-

णी दुष्टही यांची निंदा करणार नाहीं. परस्त्री माते समान हा मूर्तिमान् शब्द यांच्या जवळ नमुना पाहण्या सारखा आहे. सांप्रत यांचे चिरंजीव दोन असू न तेही सद्रूळणांतच आहेत. सांप्रत ह रिबावांचा वृद्धापकाळ आला आहे; प ण जर कोणास त्या सत्पुरुषाचें दर्शन घ्यावें असें वाटेल, तर त्याजला विशेष परिश्रम नाहींत. ते आपल्या रामसंस्थ नांतच अक्षय सोवळ्यांत बसलेले अ सतात. कोणी आल्यास त्यांजवळ प्रेमा नें संभाषण करितात. असो या सत्पु रुषांच्या घराण्याचा जो मी इतिहास लिहिला, याचा मुख्य उद्देश वरील सूच नेवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच; परंतु "आदरात् द्विरुक्तिः" या न्यायानें पुन्हा श्रुत करितों कीं, जर सर्वांनीं हा अ

न्याय झाला म्हणून बोभाटा केला तर
अद्याप बडोदें संस्थानांतून वर्षासन चा-
लू आहे तें तरी ज्याचें त्यास मिळण्याचा
संभव आहे. सांप्रत बडोदसंस्थानचे म-
हाराज अति सूज्ञ व विद्वान् असल्या
कारणानें त्यांच्या कानापर्यंत ही गोष्ट गे-
ली तर कार्यभाग होण्यास क्षणभरहि
वेळ लागणार नाहीं. कारण तेथील रु० व-
र्षासनखातीं पडत असूनही तूर्त सं-
पादकाच्या वंशास मिळत नाहीं. दुसरी
गोष्ट- तें संस्थान ही अद्याप हरिबावां-
च्या हातांत घेण्याचा असा मुद्दा दिस-
तो कीं, हें संस्थान आत्मारामबावांनीं
स्वतः च्या परिश्रमानें केवल भिक्षेवर-
च तयार केलें आहे. तेव्हां याची माल-
की फक्त आत्मारामबावांचीच असून
सार्वजनिक द्रव्यानें हें काम झालें अस-

त्यामुळें हरिबाबांस त्या मंदिरांतून का-
ढून देण्याचा अधिकार कोणास पोंचणा-
र नाहीं. व भाऊरसूल यांस संस्थान-
ची व्यवस्था पाहण्याचा जरी आत्मारा-
मबाबांनीं अधिकार दिला असला तरी
सार्वजनिक मिळतीचे भाऊरसूल हे मा-
लक होणार नाहींत. अथवा सार्वजनि-
क भिक्षा द्रव्यानें मिळविलेल्या इष्टेटी-
ची मालकी संपादकाच्या वंशाशिवाय
दुसऱ्यास मिळणार नाहीं. त्यांतून सां-
प्रत भाऊरसूल यांजकडून त्या देवस्था-
नांत पूजा नैवेद्यादिकां करितां ज्या गृह-
स्थांची नेमणूक झाली आहे ते गृहस्थ
आत्मारामबाबांच्या जातीचे नसून राम-
दास सांप्रदायी ही नाहींत; इतकेंच नव्हे
तर नवीन अक्कलकोटी गुरुसंप्रदायाचे दिस-
तात. हा प्रकार सर्व उघडच दिसत आहे.

परंतु हरिबावा त्या ठिकाणांतून सुमारें सत्तीस वर्षे बाहेर पडले आहेत व अनेक त्रासामुळें आजपर्यंत त्यांनी या कामीं उद्योग ही केला नाहीं. तेव्हां आतां सांप्रतच्या कायद्याच्या आधारें हें संस्थान हरिबावांच्या ताब्यांत जाण्यास कांहीं मार्ग आहे कीं नाहीं हाच मुख्यत्वें करून विषय वाचकांपुढें मांडावयाचा आहे. सबब हरिबावा हे आत्मारामबावांचे निःसंशय वंशीयच आहेत, या विषयींचा प्रथम पुरावा दर्शित करितों.

## संमती पत्र नंबर १.

शके १७९० विभवनामसंवत्सरीं मुंबईंतच आत्मारामबावांचे पौत्र हरिबावा यांनीं या संस्थानच्या संबंधानें आपणास माहिती काय आहे व या संस्थानचे मालक आपण कोणास समजता

असा कित्येकांस प्रश्न केला होता, त्याचें उत्तर जें खालीं सह्या करणारां-कडून मिळालें तें येणें प्रमाणें:-

श्रीगुरु आत्मारामबावा महाराज यां-नीं आपल्या देहावसानीं तुमचे तीर्थ रूप रामभाऊ यांजला आणवून त्यां-स संप्रदायानुरूप अनुग्रह व पट्टशि-ष्यत्व देऊन आपला सर्व अधिकार त्यांजला दिला. आणि त्यांचें देहावसा-न झाल्यामागें त्यांचें पारत्रिक कृत्य रामभाऊ यांनीं करून संस्थानांत अ-धिकारी असताना भिक्षा मागून सं-स्थानचा सभामंडप व त्याच सभामंड पांत श्रीरामजीच्या समोरच घोंटीव पा षाण निर्मित आत्माराम बावांची समा-धि बांधली व जीवमानपर्यंत संस्थान च्या अधिकारानें वहिवाटही केली या

वरून रामभाऊ यांस आम्ही सर्व लोक आत्माराम बावा यांच्या ठिकाणीं मानीत असून त्या सिद्ध सत्पुरुषाची सेवा जी कांहीं स्वहितार्थ करावयाची ती त्यांच्या संप्रदायानुसार त्यांनीं आपल्या संस्थानीं रामभाऊ यांस सच्छिष्य जाणून स्थापित केल्या मुळें त्यांस साक्षात् पुत्रवत् मानून व तद्वंश्यांची पूजा करणें शास्त्रतः योग्य आहे, असें ही समजून रामभाऊ यांचीच करीत होतों. संस्थानच्या सद्व्यया करितां सेवा द्रव्य ही शक्त्यनुसार वारंवार देत आलों. त्यानंतर प्रस्तुत आपण हरिबावा रामभाऊंचे चिरंजीव हे आत्माराम बावांचे नातू असें समजून यथाशक्ति द्रव्यादि द्वारा सेवा करणें ती आपलीच करीत आहों. यावरून सर्व या संस्थान संबंधीं

अधिकार आपणाकडेसच आहे.या प्रमाणें हकीगत आह्मांस ठाऊक आहे. मिती चैत्रशुद्ध १ बुधवार.

१ त्र्यंबोकोबा धोंडभट माडखोळकर.
१ बाळशास्त्री मोडक नाशिककर.
१ गोविंद सखारामबाबा गुर्जर चौलकर.
१ बाळाजी विठ्ठल गोरे.
१ रामकृष्ण नारायण.
१ काशिनाथ धोंडदेव गुर्जर पाध्ये.
१ रामकृष्ण महेश्वर जडये.
१ रघुनाथ मुकुंद.
१ गणेशशास्त्री नेने.
१ दाजी सदाशिवशा० फाळके त्र्यंबकक‌र
१ पांडुरंग दयाळ भातखंडे.
१ श्रीधरभट लिमये रा० विजयदुर्ग.
१ पांडुरंग शिवराम भावे अनुष्ठानी.
१ नरसिंहशा० गोविंदशास्त्री साठेवाईकर

१ रामचंद्र शामराव केसकर.
१ पांडुरंग रामचंद्र शास्त्री पुरोहित.
१ माधवराव बिन बापू पंडित हरिपुरकर.
१ माधव राव वासुदेव मोने जि० रत्नागिरी
१ विश्वेश्वर सदाशिव छत्रे.
१ त्रिंबक केशव वैद्य.
१ गोविंद कृष्ण भट नाख्ये.
१ विश्वनाथ बहिरव सहस्त्रबुद्धे.
१ त्रिंबक केशव भट पेणसे.
१ सदाशिव शिवराम.
१ गोविंद भट बिन भिकंभट खाडिल.
१ विष्णु भट बिन सदाशिव भट.
१ सखाराम भास्कर भट जावदे.
१ नारो कृष्ण डुमाळे.
१ नारायण पं० बिं० बापू पंडित वेंगुरलेकर.
१ नारायणशा० बिन विश्वनाथशा० पुराणिक.
१ सदाशिव अनंत शास्त्री लेले त्र्यंबककर.

१ महादेव शास्त्री धर्माधिकारी रेवदंडेकर.
१ तात्या गोविंद शास्त्री खेडकर नाशीक.
१ गोविंद अनंत शास्त्री लेले त्र्यंबककर
१ बाळकृष्ण अमृत निपुणगे नाशीकक-
र ऊर्फ अप्पा गोसावी.
१ मोरो त्र्यंबक जोशी नाशिककर.
१ बाळंभट बिन केशवभट महाजन.
१ कृष्णशास्त्री गोरे.
१ लक्ष्मणशास्त्री जांभेकर मु० पोंभुर्ले.
१ विठ्ठल बाबा मिरजोळकर.
१ रामचंद्र निळकंठ जोशी पिंपळवंडीक
१ महादाजी विठ्ठल.
१ गणपतराव नारायण परांजपे.
१ जनार्दन बाबा बिन जगन्नाथबाबा
सं० नारगांव.
१ यज्ञेश्वर लक्ष्मण पाध्ये गोळवलकर
१ गोविंदराव भिकाजी पटवर्धन खोत.

१ विनायक त्रिंबक गोसावी सातारकर.
१ सदाशिव शिवराम भावे.
१ वामन बापूभट सादले नेरुरकर.
१ रावजी पांडुरंग तपस्वी.
१ मोरो जयराम धामणकर.
१ बाळंभट भिकंभट मोडक.
१ विठ्ठल बल्लाळ खरे.
१ भाऊ गोपाळ भावे चिपळूणकर.
१ आपाशास्त्री खाडीलकर नाशिक.
१ रामकृष्ण हरी भागवत.

५८

## संमती पत्र नंबर २

हरिभक्त हरिबाबा रामदासी यांच्या आमंत्रणावरून मिती आषाढ वद्य १४ शके १८०७ रोजीं सुमारें २०० मंडळी हरिबावांच्या राममंदिरांत जमली होती. त्या वेळीं हरिबावांनीं मंडळीस प्रश्न के-

ला कीं आत्मारामबावांच्या ठाकुरद्वारावर व तत्संबंधीं मालमत्तेवर माझा वारसाचा हक्क आहे कीं नाहीं हें माझे कागदपत्र पाहून सांगावें. त्यावरून तेथें कागदपत्र वाचलेही गेले. परंतु त्यावेळीं एकदम निर्णय होईना म्हणून सर्व मंडळींनीं त्या कामीं आपल्यातर्फें अक्का पंच नेमून सभाविसर्जन केली. नंतर श्रावण शु० १२ रोजीं पुन्हा अक्का पंचांनीं सभा भरविली त्यासमोर सर्वकागदपत्र पाहून अक्का पंचांनीं ठरविलें कीं, ज्या अर्थी आत्मारामबावांनीं सर्वजातीच्या भिक्षेनें हें मंदिर बांधिलें आहे. व त्यांनीं रामभाऊस आपल्या हातानें गादीवर स्थापन करून संस्थानची सर्व मिळकत त्यांच्या हवालीं केली आहे त्या

अर्थी त्यांचे पुत्र हरिबाबा हेच यासंस्थानचे मालक आहेत. व त्यांच्या सर्व मालमत्तेवर त्यांचा हक्क आहे यांत संशय नाहीं.

१ राजारामशास्त्री बोडस.

१ शिवराम नानाजी देशपांडे रामदासी

१ गोविंद शंकर शास्त्री बापट.

१ महादाजी वासुदेव पेणसे.

१ यशवंत वासुदेव अठल्ये.

१ अपाजी पांडुरंग करंजीकर.

१ नारायण विश्राम दळवी.

१ विठोबा कृष्णराव

१ माधवराव जगन्नाथजी.

१ नारायण बाप्सोबा धुमे

१ सदानंद त्रिंबकजी.

## संमती पत्र नंबर ३.

## मुंबईतील भाऊ रसूल यांच्या जातीच्या गृहस्थ मंडळीची संमति.

१ भाऊ रखमाजी.
१ कृष्णनाथ नारायणजी.
१ शिताराम बाळाजी.
१ नारायण गोविंदजी.
१ येशवंत राव विठोजी.
१ श्रीनिवास रामचंद्रजी.
१ माधवराय जगन्नाथजी. तळणदे.
१ पुरुषोत्तम बाळकृष्णजी.
१ हरिश्चंद्र नारायणजी.
१ वसंतराव राघोबा.
१ गणपतराव मोरोजी.
१ सदानंद विश्वनाथजी.
१ नारायण रामचंद्रजी.
१ हरिश्चंद्र रामचंद्रजी.

१ पांडुरंग रामचंद्र चिमणाजी नवलकर.
१ पुत्तोबा गणोबा.
१ आत्माराम शिवबा.
१ विश्वनाथ माधवजी.
१ सदानंद वेंकाजी.
१ वासुदेव रामचंद्र.
१ आत्माराम रामचंद्रजी.
१ एस्. व्ही. धुरंधर.
१ के. एस्. धुरंधर.
१ बाजीराव नात्यारावजी रणाजित.
१ मोरोबा बाळकृष्णजी.
१ कृष्णराव भास्करजी.
१ रामचंद्र केशवजी.
१ विठ्ठलराव शामराव.
१ हरिश्चंद्र शामराव.
१ नारायण राघोबा.
१ जी. कृष्णराव.
३१

१ माणिकजी दामुलजी.
१ नारायण हरिश्चंद्रजी.
१ पांडुरंग शिवजी मेस्तरी.

## संमतीपत्र नंबर ४.

संस्थान बडोदें येथें हरिभक्त परायण भाऊ महाराज यांच्या निमंत्रणावरून श्रीलक्ष्मण महाराजांच्या मंदिरांत कार्तिक शु० १५ सं० १९४२ रोजीं सभा जमली होती, त्या दिवशीं सर्वांनीं हरिबावांस लिहून दिलें कीं आत्माराम बावा रामदासी मुंबई ठाकुरद्वारचे अधिकारी यांच्या गादीवर आपले वडील रामभाऊ रामदासी हे आत्मारामबावांच्याच हातून स्थापित झाले व त्यांच्या हातीं आत्मारामबावांनीं आपला सर्व अधिकार दिला त्यांच प्रमाणें आपण

" रामभाऊंचे औरस चिरंजीव आत्मा-
रामबावांच्या सर्व मालकीचे हक्कदार
आहांत असा आमचा पूर्ण अभिप्राय
आहे."

१ बाळागोसावी (उर्फराजारामबावादाना-
१ राजारामकाशिनाथ शास्त्री. [ ध्यक्ष.)
१ बाबा दिक्षित पुराणीक सरकारी.
१ गोपाळबावागुरु बापूबावा ज्ञानमठ.
१ रामकृष्ण उपाध्ये.
१ सखाराम शास्त्री अलंकारी.
१ गंगाधर शास्त्री पराडकर.
१ रामकृष्ण हरि रामदासी सं० ल-
क्ष्मण महाराज.
१ बाळंभट बिन यादवभटपुराणीक गरूड.
१ चिंतामण राव नारायण मुजुमदार.
१ भगवंतबावा बिन सितारामबावा दिंडोरकर.
१ अनंदराव लक्ष्मण ऊर्फ भाऊ खेडकर.

१ रामचंद्रराव जगताप.
१ बजाबा अमृतराव बोबा वणीकर.
१ खंडेराव शिवराम फुणशे.
१ पुरुषोत्तम गोविंदराव रोडे.
१ शास्त्री बद्रीनाथ त्र्यंबक नाथ.
१ गणेश नारायण फाटक.
१ नारायणराव माधव बक्षी अमदाबादकर
१ गंगाधर यादव गरुड.
१ अन्याबा गोसावी त्र्यंबककर.
१ रामचंद्रराव घोरपडे.
१ बाळकृष्ण गोविंद जोशी कोल्हापुरकर
१ चिमणराव काळे.
१ नारायण भट काळे आत्मारामबावाचे
१ विनायक भाऊ राजगुरु. [शिष्य
१ सदाशिव धोंडदेव घारपुरे.
१ माधवराव शेषाद्रि.

२८

शिवाय पृथक् आलेलीं संमतीपत्रें.

१ रा० सा० विश्वनाथनारायण मं० वकील
हायकोर्ट.
१ आत्माराम शिताराम परभू.
१ वे० शा० सं० राजारामशास्त्री बोडस
महामहोपाध्याय.
१ गोविंद सखाराम गुर्जर.
१ गणेश महादेव कोशे माहिमकर.
१ शिताराम गणेश रहाळकर.
१ भिकंभट करमरकर अनजरेकर.
१ रामचंद्र शामराव केसकर.
१ सखंभट शेंबेकर जंजिरा.
१ माधवराव भाऊ काळे.

१०

मिळून जर १३९ सभ्य लोकांचे स्व-
दस्तुरचे लेख आहेत व त्या लेखांत गु-
रुसंप्रदायाप्रमाणें शिष्य झालेले राम

भाऊ हे तारस शास्त्रोक्त असल्याव
द्दल जर राजाराम शास्त्रीबावा व राव
साहेब मंडलीक अशा जगमान्य पुरु-
षांचे लेख आहेत, तर रामभाऊंचे औ-
रसपुत्र हरीबावा हे ठाकुरद्वारचे मा-
लक ठरतील यांत शंका नाहीं. परंतु
आतां हरिबावांची वहिवाट फार दिवस
सुटली आहे तेव्हां कसें होईल याबद्द-
लची थोडी चर्चा करूं.

### या बद्दल एकंदर प्रश्न.

प्रथमचा प्रश्न हा कीं जरी हरिबावां-
स, भाऊ रसूल यांनीं आत्मारामबावां-
कडून मिळालेल्या अक्त्याराच्या जो-
रावर सरकार मार्फत मंदिरांतून काढिलें
आहे आणि या व्यवस्थेवर अपील न
होतां जरी सततीस वर्षें गुदरून गेलीं
आहेत तरी आत्मारामबावांच्या सं-

स्थानची अखत्यारी गृहस्थांकडून अ-
व्यवस्था होऊं लागली तर पाहिजे ते-
व्हां हरिबाबांस या कामीं हात घालतां
येईल कीं नाहीं.?

उत्तर- एक खालीं सही करणारा
सुज्ञ गृहस्थ म्हणतो कीं, शंभर वर्षां-
नंतर ही हात घालतां येईल.

त्याचा स्वदस्तूरचा लेख.

दावा चालविण्या बद्दल वारसाच्या
हक्काविषयीं खालीं लिहिलेला कल-
कत्ता हायकोर्टाचा ठराव आहे.

मृत्युपत्र करून मरणारांनीं धर्मकृ-
त्याकडे किंवा दानधर्माकडे आपल्या
संपत्तीचें ट्रस्ट केलें असेल व त्यांत
मसताच्या वारसांस फायदा नसेल,
तर वारसांस ट्रस्ट नीटरीतीनें चालत
नसल्यास तें नीट चालवावें असा

दावा करितां येईल.

इंडियन लॉ. रिपोर्ट वर्ष ५ वें कलकत्ता सिरीस पान ७०० पहा.

उपासक, पुजारी वगैरेंच्या हक्काबद्दल मुंबई हायकोर्टाचा ठराव.

देवस्थानां संबंधीं दावे सिव्हिल प्रोसिजरकोड १८७७ चा आक्ट १० वा कलम ५१०

देवस्थानांतील पुजारी किंवा उपासक यांस देवतेच्या फंडा संबंधीं किंवा मिळकती संबंधीं अथवा देवस्थानास लागून असलेल्या हरएक द्रव्यासंबंधीं अफरा तफर झाली असा दावा आणण्याचा हक्क आहे.

राधाबाई कोम चिमणाजी साळी. विरुद्ध चिमणाजी बिन रामजी साळी. इं. ला. रि. ३ मुंबई पान २७.

ता०२१ मार्च १८८५ } आत्माराम शिताराम परभू.

प्रश्न दुसरा— आत्मारामबावांच्या संस्थानांत कांहीं मठसंप्रदाया विरुद्ध कामें होऊं लागल्यास या कामीं हरिभावांवांचून दुसऱ्याला हात घालण्याचा अधिकार पोंचेल किंवा नाहीं ?

उत्तर— रावसाहेब मंडलीक यांच्या हातचा एक लेख आहे कीं, "वहिवाटदार यांनीं ब्राम्हणाशिवाय कोणी नेमिल्यास अथवा संप्रदाया बाहेर काम केल्यास देवळांत जाणारा कोणी ही रामभक्त फिर्याद करूं शकेल."

तारीख १३ माहे जून सन १८८०

प्रश्न तिसरा– संस्थान बडोदें येथून आत्मारामबावांनीं रु० दोनशेंचें वर्षासन संपादन केलें आहे. तें हल्लीं त्यांच्या वंशजांस न मिळतां ठाकुरद्वारांत जातें. तें आतां हरिबावांस उद्योगानें मिळेल किंवा नाहीं ?

उत्तर— बडोदसंस्थानांतील खालीं सही करणाऱ्या एका सभ्य गृहस्थाचा हरीबावांजवळ असा लेख आहे कीं, “ बडोद्यांस जाऊन आपले प्रकरणाचा तपास करितां संवत् १९२३ तें संवत् १९३० पर्यंत यामहालीं रुपये २०० आत्मारामबावा रामजीमंदिर मुंबई म्हणून दरसाल खर्ची पडलेले आहेत. ही नेमणूक देवस्थानास नाहीं. आत्माराम बावा यांस खुद्दची आहे. जर देवस्थानास असती तर वर्षासनखातीं

खर्ची पडलेली नसती. तेव्हां ज्यांणीं वर दर्शविलेले दरसालचे रु० घेतले त्यांणीं केवळ दगलबाजी केली असें होत आहे."

मिती चैत्र व० १३ } गोपाळ बल्लाळखरे
शके १८०७. } मु० देहगांव.

शिवाय हरिबावा यांचे वडील रामभाऊ आणि अखत्यारी भाऊ रसूल या उभयतांत जेव्हां कलह उत्पन्न होऊन उत्साहही वेगळे होऊं लागले होते. त्यावेळीं कांहीं दिवस वर्षासनें मुळींच बंद राहून अखेर निकाल, श्रीमंत गोपाळराव मैराळ यांच्यामार्फत झाला. त्याबद्दल व पुढें रामभाऊंकडे वर्षासनें येऊं लागल्या बद्दल पाहिजे तितका मजबूद पुरावा आहे.

वर्षासन संबंधानें बडोद्यांहून राम-

चंद्र आत्माराम अथवा रामभाऊ अ
शा नांवानें आलेल्या पत्रांपैकीं पत्रें
ची टीप–

१ शिवराम बळवंत फुणशे यांचें पत्र
संवत् १८९३ चें घोरपड्यांकडील व
र्षासन पाठविल्याबद्दल.

२ माधवराव काळे यांचें पत्र संवत्
१९०४ चें वर्षासन पाठविल्याबद्दल.

३ माधवराव काळे यांचें पत्र सं० १९०५
चें वर्षासन पाठविल्याबद्दल.

४ केशव गणपतराव काळे यांचें पत्र
संवत् १९०६-७-८ चीं वर्षासनें
पाठविल्याबद्दल.

५ बजूबाई घोरपडीचें पत्र संवत् १९२२
अखेरची बाकी पाठविल्याबद्दल.

६ माधवराव काळे यांचें पत्र मागील
सालची पावती पाठवावी म्हणून.

७ माधवराव काळे यांचें पत्र दुष्काळामुळें तूर्त ऐवज पाठविण्यास सवड नाहीं.

८ भाऊ काळे यांचें पत्र ऐवज पाठवितों वगैरे.

१ व्यंकटराव घोरपडे यांचें पत्र.
सदहू वर्षासन [redacted] भाऊ कडून बंद करून भाऊ रसूल यांजकडे चालू करण्यास केवळ स्नेहसंबंधानें श्रीमंत बोझे कारभारी हेच कारण आहेत.
प्रश्न चवथा — ठाकुरद्वार संस्थानची मंदिर शिवायकरून बाकीची जागा [illegible]का बाईची स्वतःच्या मालकीची होती ती तिनें केवल रामभाऊ रामदासी हरीबावांचे वडील यांसच बक्षीस दिली आहे. तें अस्सल बक्षीसपत्र [illegible]र असेल आणि मध्यंतरीं जर ती

जागा त्यांच्याच आजाच्या अरवूत्या-
च्याच्या ताब्यांत राहिली असेल तर
ती आतां हरिबावांस मिळूं शकेल कीं
नाहीं?

उत्तर- खालीं सही करणाऱ्या एका
गृहस्थाची संमति आहे कीं अरवत्या-
री मनुष्याच्या ताब्यांतील मिळकत
पाहिजे तेव्हां घेतां येते.

मिति वैशाख शु० १ शाके १८१३ — खंडोपंत लेले वकील पुणें.

प्रश्न पांचवा- रामभाऊ यांनीं आ-
त्मारामबावांची समाधि व सभामं-
डप स्वतः खर्च करून बांधिला आहे
तेव्हां त्याजवर त्यांची मालकी अ-
सावी किंवा नसावी?

प्रश्न ६ वा- वाडीसरकारांतून वेंगुर्ले
येथील महालक्ष्मी मिठागर तिरूसा

मयातैन अल्लफ चंद्र ७ माहे रमजान
र्गी आत्मारामबाबांस वंशपरंपरा
इनाम मिळालेला असून बरेच दिवस
चालत होता परंतु सुमारें चाळीस व-
र्षे जप्त आहे व त्याची चौकशी इंग्र-
जसरकार मार्फत सन १८६९ सप्तंबर
ता० १२ पर्यंत चालू राहून तुम्ही स्व-
तः आल्यावर हुकूम होणें तो होईल.
असा अखेर हुकूम आहे. तर आतां त्या
बद्दल कांहीं उपाय आहे कीं नाहीं?
प्रश्न स्नातवा— आत्मारामबावा यां-
नीं भाऊरसूल यांस कांहीं अखत्या-
र लिहून दिला असला, तरी त्यांच्या
स्वतः बद्दलच्या लेखावर भाऊरसूल-
च्या वंशपरंपरेस त्या अखत्याराचा
हक्क पोंचेल कीं काय? व आत्मारा-
मबावांच्या पुढील वंशीय पुरुषांस

भाऊरसूलच्या सर्ववारसांनी ता-
ब्यांत वागवावें कीं काय?

या ७ प्रश्नांच्या संबंधें जी मतें व जे पुरावे आहेत ते सर्व वाचकांपुढें ठे-
विले आहेत. तर या बाबतींत काय-
द्याच्या आधारानें कमीजास्त रस्ता शोधून काढण्याची ज्याची जितकी शक्ति असेल तितकी त्यानें परिश्र-
म घेऊन खर्च करण्यास तिळभरही आळस करूं नये. कारण जीं परमा-
र्थाचीं महत्वाचीं कामें असतील, त्यांत ही हें काम अग्रगण्य मानलें जात आहे. या प्रकरणांत कांहीं अं-
शतः ही कोणा सद्गृहस्थाकडून आ-
त्मारामबावांच्या वंशीयांस फायदा झाल्यास व हरीबावांची आत्माराम बावांच्या समाधीशीं भेट झाल्यास

गोवत्स संयोग करून दिल्याचा त्या-
जला पुण्यांश आहे.

ज्यांस या संबंधानें परमार्थबुद्धी-
नें मतें कळविणें आहेत ते मुंबईयेथें
खालीं लिहिलेल्या पत्त्यावर पत्रद्वा-
रा कळविण्याची कृपा करतील वके-
वल मतें मिळविण्याकरितांच जर
मोठ्या खर्चानें हीं पुस्तकें आम्हीं छा-
पिलीं आहेत तर या कामीं तिकिटा
करिसां अर्धा आणा खर्च झाल्यास
ही ते आनंदानें खर्च करतील अ-
शी आम्ही आशा करितों. हीं पुस्त-
कें पोंचल्यापासून दोन महिन्याच्या
आंत मात्र मतें पाठविण्याची मेहेरबा-
नी व्हावी. कारण पंचमुखी परमेश्व-
रानें कांहीं रस्ता दाखविला तर पुढें म-
जल चालण्यास ठीक पडेल. कदाचित्

कोणी कांहीं या संबंधानें मतें वर्तमानपत्रांतही प्रसिद्ध केल्यास त्याची ही एक प्रत मेहेरबानीनें पाठविण्यांत यावी. अगर अमुक पत्रांत व अंकांत लिहिलेलें आहे म्हणून तरी माहिती मिळावी हे विनंती.

पत्ता- मुंबईत पालवाचे रस्त्यावर हरिबावा यांचे ठाकुरद्वारीं रामचंद्र गोविंदशास्त्री बाम यांस देणें.

विशेष सूचना.

सदरहू इतिहास जो लिहिला, याचा हेतु फक्त मतें मिळविण्याचाच आहे. ज्यास्त प्रती लिहिण्यास अडचण पडते म्हणून छापविला आहे. तथापि कोणाचे अब्रूच्या संबंधानें नुकसान होऊं नये सबब या प्रतीचा मतें देण्यापुरताच उपयोग होईल अशी तजवीज ठेवावी.

# प्रार्थना.

गीं सज्जनातें असे प्रार्थना कीं ।
गुरूच्याचि द्वारें असे सौख्य नाकीं ॥
ह्मणोनी भजा सद्गुरूच्या कुळाला ।
का ऊपटूं त्या सुखाच्या मुळाला ॥ १ ॥
गत्तारकानां जिथें दुःख आहे ।
थें आपदा सर्व देशासि राहे ॥
ह्मणोनी सदा संतकाजा झटावें ।
ती कष्ट होतां न मागें हटावें ॥ २ ॥
हीनेषु दयालवः स्पृशति यानल्पोपि
श्रीमदो, व्यग्रा येच परोपकारकरणे
ष्यंति ये याचिताः ॥ स्वस्थाः संति च
वनोन्मदमहाव्याधिप्रकोपेपि ये,
स्तंभैरिव सुस्थिरैः किलभरक्रांता धरा
धार्यते ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

समाप्त.

[illegible]

म. ग्रं. सं. ठाणे

विषय .

[illegible]

संग्रहालय क्रमांक

[illegible]

लेखक प्र. मनोरंजन ग्रंथ प्रसारक मंडळी

सन

[illegible]

पुस्तकाचें नांव [illegible]

बाइंडर्स ॲण्ड स्टेशनर्स
एम्. एल्. घाग
कल्याण.

दालसूचीत नोंद नाही.
२८/४/१९८८

No ९५४

Rao Bahadoor Vinayak Govind Kolhatkar[?]

Dated 27th November 1878

Price Rs A. P.
4

Ra[?] Gan[?]



# तारामती

स्त्रियांचें मुख्य शस्त्र जें पातिव्रत्य, याच्या सहायानें त्या पाहिजे तें करू शकतात. एका मोठ्या विद्वानाचा असा सिद्धांत आहे कीं; पतिव्रतेस जें अवघड, तें सोपें असें ह्मणणारा साऱ्या जगांत एकही मिळावयाचा नाहीं. अनंत काल पर्यंत एकनिष्ठ तपश्चर्या करून महत्वास पावलेले असे जे मोठमोठे ऋषी, तेही पतिव्रतेच्या तीव्र तेजानें दिपून जातील मग इतरांची काय कथा? आमचा उद्देश प्रस्तुत स्त्रियांचें तिव्र पतिव्रत्य सांगण्याचा आहे, यासाठीं विशेष पाल्हाळ न करितां राजा हरिश्चंद्राची धर्म पत्नी, महा पतिव्रताजी तारामती, तिची कथा सांगण्यास प्रारंभ करितों.

तारामतीचीं मातापितरें कोण, कोठलीं, वगैरे इतिहास आह्मास मिळत नाहीं ह्मणून आह्मी फार दुःखी आहों. अशा साध्वीचा वंश जर समजता, तर अधिक मौज झाली असती, तथापि विश्वामित्रानें हरिश्चंद्रासाठीं तिच्या छळास प्रारंभ केल्यापासून तों, हें पुण्यशील दंपती वैकुंठ लोकास जाई पर्यंत कथा महाभारतांत सांगितली आहे, तींतून तारामतीच्या संबंधा पुरती सांगण्यास आह्मी आतां प्रारंभ करतों.

एके दिवसीं राजा हरिश्चंद्र, आपल्या प्रियभार्येसह अरण्यांत शिकारीस गेला असतां * एका बागांत विश्रांतीस राहिला. तेथें उपाहारादि विधि झाल्या नंतर भार्येच्या मांडीवर डोकें ठेऊन निजला असतां एकाएकीं कोणा ब्राह्मणास सर्व राज्य दान दिल्या-

---

* इंद्र सभेंत वसिष्ठाची व विश्वामित्राची प्रतिज्ञा होऊन विश्वामित्र हरिश्चंद्राचें सत्वहरण करण्यास निघाला आहे. व राजास मोहांत पाडण्यासाठीं त्यानेंच हा मायावी बाग निर्माण केला. याच ठिकाणीं दोन सुरूप मायावी स्त्रिया राजाचें एकपत्नीव्रत नष्ट करण्या करितां पाठवून त्यांचा यत्न निष्फळ झाल्यानें राजाची एक परिक्षा घेणें राहिली आहे.

चें व लागलीच एक विवशी येऊन गळीं पडल्याचें स्वप्न पाहून दचकून जागा झाला. तारामती, राजाचें सर्व बरळणें ऐकत होती, तरी निद्राभंग भीतीनें तिणें त्यास जागें केलें नाहीं. राजा जागृत झाल्यावर त्याची ती भयभीत मुद्रा पाहून तिणें त्याचें पुष्कळ प्रकारें समाधान केलें. तोही मोठा ज्ञाता असल्यानें शास्त्रदृष्ट्या दुस्वप्ननिरसनीविध करून निश्चित झाला. इतक्यांत † एक वृध्द ब्राह्मण येऊन मोठया क्रोधानें राजाची निर्भर्त्सना करूं लागला कीं; "तूं मोठा दान शूर ह्मणवितोस आणि दानाची दक्षणा देत नाहींस, हेंच धर्म भीरुत्व काय ? अरे मला तूं राज्य दान केलेस; परंतु त्यावर दक्षणा नाहीं याविषयीं तुला काळजीच नाहीं काय ? अरे ज्याप्रमाणें भ्रताराचांचून स्त्री, त्याचप्रमाणें दक्षणेवांचून दानही निष्फल आहे. तूं सत्ताधारी आहेस, आह्मी काय कफल्लक ब्राह्मण, नाहीं ह्मटलेंस तर आह्मी काय करणार; पण तुजसारख्या पुण्य श्लोकाला ऐश्वर्य मदानें विस्मृति पडून अधोगती न मिळावी ह्मणून ही सूचना करितों." ब्राह्मणाचें हें वाक्य ऐकतांच राजास स्वप्नाचें स्मरण झालें व ब्राह्मणाचें वचन मान्य करून दक्षणा देण्यासाठीं ब्राह्मणासह अयोध्येस निघाला. अयोध्येस गेल्या बरोबर राजानें खजिनदारास ब्राह्मणास इच्छापूर्त द्रव्य देण्याचा हुकूम केला, तो ऐकतांच ब्राह्मण संतापून ह्मणाला; "राजा, दत्त दानावरच दानशूरत्व दाखवावयाचें होतें, तर मला येथपर्यंत हेलपटा तरीं कशाकरितां दिलास ? तेथेंच नाहीं ह्मटलें असतेंस, तर मी तुझें काय करणार होतों ? प्रारंभीं सर्व राज्य दान दिल्यावर राज्य संबंधी खजिन्यावर तुझी सत्ता कशीरे पोंचते? धर्म न्याय ह्मटला तर हें सर्व माझें आहे, आतां यावांचून देशील तें दक्षणेंत जमा होईल." आपला प्राणप्रिय अशा संकटांत आहे हें तारामतीनें पाहातांच तिला आपल्या जामदार खान्यांतून दक्षणा देण्याची बुद्धि उपजली आणि वाड्यांत प्रवेश करणार, इतक्यांत

† तोच विश्वामित्र तपःसामर्थ्यानें स्वप्नांत आला होता.

ब्राह्मणानें मोठ्या क्रूर मुद्रेनें तिला प्रतिबंध केला. स्वप्नांतील सर्व गोष्टी खोट्या, अशी जरीं सुशिक्षित तारामतीची पूर्ण खात्री होती, तरीं आपलें मुख्य दैवत जो पति, तो ज्या कृत्यास अनुसरला, त्यास व्यत्यय आणण्यास तिचें धैर्य होईना. तिणें मोठ्या नम्रतेनें ब्राह्मणास प्रमाण करून ह्मटलें; "महाराज, सर्व राज्य आपलें झालें अर्थात राज्य संबंधी खजिना ही आपला झाला, परंतु माझ्या पित्याकडून, सासऱ्याकडून व पतीकडून मिळालेलें जें माझें स्त्रीधन, तें अर्पण करून मी आपलें दक्षणा ऋण फेडियें, मात्र तेवढें आणण्यासाठीं मला आंत जाण्याची परवानगी असावी." तारामतीचें हें जगन्मान्य भाषण, त्या नष्ट ब्राह्मणास मान्यच झालें नाहीं, एवढेंच नव्हे, त्यायोगानें त्यास अतिशय राग येऊन कांहीं एक विचार न करितां तारामतीस त्याणें ताडण ही केलें आणि अतिकठोर शब्दांनीं ह्मणाला; "दुष्टे, मला न्याय शिकवित्येस काय? स्त्रीच्या संपूर्ण देहावर पतीची सत्ता असतां तिच्या द्रव्यावर त्याची सत्ता नाहीं हें सांगून ब्राह्मणास फसवूं पहात्येस काय? बरें असो, तुजपाशीं अधिक बोलून मी आपला जीव श्रमवीत नाहीं; राजा, सांग आतां कसें करतोस तें. मला आतां फार बोलतां येत नाहीं, एकच सांगतों. दक्षणा देणें असेल तर लवकर दे, नाहीं तर तसेंच सांग ह्मणजे मी आपला चालता होतों, ब्रह्मस्वापहारानें परमेश्वर तुझेंच कल्याण करो." ब्राह्मणाची हीं निष्ठुर भाषणें ऐकून राजास व त्याच्या साध्वी भार्येस परमावधीचें दुःख झालें; तथापि वचन रक्षण हाच जो मुख्यधर्म, त्यावर दृष्टि देऊन त्यांणीं देहविक्रय करून ब्राह्मणाची दक्षणा देण्यांचा निश्चय केला. राजानें ब्राह्मणापासून सात दिवसांची मुदत मागून घेतली व * नवखंड पृथ्वीच्या बाहेर काशी हें दहावें खंड आहे, ह्मणून तेथें

* हिंदुधर्मी चालणाऱ्या भागाचे नऊ खंडें कल्पिलीं आहेत व काशी हें भुकैलास अशा समजुतीनें नवखंडांत न गणतां वेगळें मोजण्याचा प्रघात आहे. "नवखंड पृथ्वी व दहावें खंड काशी" ही ह्मण आबाल वृद्धांस माहित असेल.

जाण्यांचा निश्चय केला. ब्राह्मणानें सात दिवसांचा करार करून घेऊन त्यांस जाण्याची आज्ञा दिली. राजा, तारामती व पुत्र रोहित, अशीं तिघें मुनिवेशानें पादचारी निघालेलीं पाहून प्रजेस जें दुःख झालें आहे, त्याचें अनुमान करण्यास विचक्षण वाचक समर्थ आहेत. सूर्याच्या कोमल प्रभेनें ही ज्यांस ताप होत असे, अशीं तीं सुकुमार तिघे त्या घोर अरण्यांतून चालत असतां त्यांना होणाऱ्या दुःखाची तसवीर आपल्या पुढें धडधडित उभी आहे व ती पहातांच आपलें काळीज फाटून जात आहे; परंतु त्या धैर्यशाली त्रिवर्गास काडीमात्र खेद वाटला नाहीं. कांहींसे दूर गेल्यानंतर राजानें तारामतीकडे पाहिलें, तों तिचें तें सुंदर मुख, रातांब्याप्रमाणें लाल होऊन, त्यावर सारखे घामाचे लोट चालले आहेत, वायूच्या तिव्र वेगानें केशांची अव्यवस्था होऊन त्यांवर धुळीचा लेप बसला आहे, पायास सूज आली आहे, अशी तिची अवस्था पाहून एवढा मोठा विचारी राजा; परंतु अगदी बेहोष होऊन गेला. तो आपली संपूर्ण स्थिति विसरून तारामतीच्या कंठास मिठीमारून मोकळ्या स्वरानें रडूं लागला. खरोखर ह्मटलें, तर तारामतीची तर या वेळीं फारच दुर्दशा व्हावी; परंतु पातिव्रत्याचें मुख्यबीज तिच्या पूर्णपणें लक्षांत होतें, यामुळें "यावेळीं आपण विवेक नकेला, तर देवाग्नि ब्राह्मणांसमक्ष **सर्व कृत्यांमध्यें सहाय करीन** ह्मणून जी पाणिग्रहणसमयीं प्रतिज्ञा केली, तिला व्यत्यय येईल." हें तत्व लक्षांत आणून तिणें राजास सावध केलें आणि ह्मणाली; "महाराज हें आहे काय? सर्व जन्मभर आपणच सुख भोगावें असा ईश्वराने आपल्यास दाखला दिला कीं काय? चाललेंच आहे, दोन दिवस सुखाचेही असतात, दोन दिवस दुःखाचेही असतात. मनुष्यमात्रावर असे प्रसंग येतात, ह्मणून आपलाक्रम सोडून रडत का कोणी बसलें आहे? आपले गुरुजी पहा बरें कसे विवेकी आहेत! शंभर पुत्र मेले, परंतु त्यांच्या समाधानांत एका काडी इतका तरी फरक आहे

काय? त्यांच्या दुःखाशीं आपलें दुःख लावून पाहिलें, तर आपण सारीं जीवंत तरीं आहों." अहाहा! धन्य त्या हरिश्चंद्राच्या अनंत जन्मार्जित पुण्याची कीं, त्याच्या संकट समयीं पुरुषानीं ठरविलेली अबला, असा सुंदर बोध करीत आहे. असो, राजानें भार्येचा उपदेश ऐकतांच सर्व शोकाचा त्याग करून अधोवदनानें मार्ग क्रमूं लागला, इतक्यांत एक दरिद्री ब्राँह्मण* आपल्या भार्या पुत्रासह राजास येऊन भेटला. राजा हरिश्चंद्र, जरीं महत्संकटांत होता तरीं ब्राह्मणाची ती अति दीन मुद्रा पाहून त्याचें अंतःकरण दयेनें एकदम खवळून गेलें. ब्राह्मणाच्या स्थितीपुढें आपली स्थिति कांहीच नाहीं असें वाटून त्याणें आपल्या पूर्व ओघाप्रमाणें ब्राह्मणास एकदम प्रश्न केला कीं; "महाराज काय इच्छा आहे?" **एकादशीच्या घरीं शिवरात्र** ह्मणून जी प्रचारांत ह्मण आहे, तिचा खरेपणा या ठिकाणीं उत्तम अनुभवास येतो. ब्राह्मणानें यांजपाशीं मागण्यासारखें काय आहे याचा विचार करून मोठ्या मानभावी काव्यानें डोळ्यांस पाणी आणून ह्मटलें; "उदारा काय तुझ्यापाशीं मागूं? परमेश्वरानें तुझ्यावरही माझ्यासारखीच वेळ आणली आहे, जर दात्यानें **माग** ह्मटल्यावर याचकानें न मागितलें, तरीं मोठा दोष आहे, यासाठीं मागतों. आह्मी त्रिवर्ग प्रवास करीत आहों, ऐश्वर्य तर दिसतेंच आहे, जर पायांतल्या वाहणा देशील, तर पायतरीं पोळणार नाहींत. तूं आपली अडचण करून देऊं नकोहो!" राजानें ब्राह्मणाच्या तोंडची हीं अक्षरें ऐकतांच आपल्या पायांतील वाहाणा त्यास दिल्या. त्याचप्रमाणें तारामतीनें आणि रोहिदासानें आपापल्या वाहणा ब्राह्मणीस व तिच्या पुत्रास दिल्या. ब्राह्मण मोठ्या आनंदानें आशिर्वाद देऊन चालता झाला व हे ही त्रिवर्ग, ईश्वरस्मरण करीत हळू हळू मार्ग क्रमणास लागले.

---

* हा ही ब्राह्मण विश्वामित्रच होय व यापुढें त्रिवर्गाचा छल करणारा म्हणून जो असेल तो विश्वामित्र असें समजावें शिवाय दुसरा आल्यास त्याचें स्पष्टीकरण असेल.

त्यादिवशीं * सूर्य अतिशय तपत होता व त्या अरण्यांत वृक्ष किंवा उदक याचा लेशही नव्हता, अशा प्रसंगीं या सकुमार राज कुटुंबाचे काय हाल झाले असतील बरें ? राजा व तारामती यांणीं तर इंद्रियांचा निग्रह केला; परंतु पाच वर्षांच्या मुलाच्यानें कसें बरें दुःख सोसवेल ? तरी त्याचा अगदीं निरुपाय होई पर्यंत त्याणें एक चकार शब्द ही काढिला नाहीं, शेवटीं अगदीं कासा विसी होऊं लागली तेव्हां प्रारब्धास ह्मणतो; " प्रारब्धा तूं इतकें दुष्ट व निर्दय आहेस हें मला पूर्वीं समजतें, तर मी तुझा अंगिकार- च केला नसता. असो आतां माझा प्राण घेऊन सर्व जगामध्यें विश्वास घाताचा ध्वज उभार! अरे दुष्टा, असे माझे हाल करण्या- स तुला धैर्य तरी कसें झालें? अरे, पुत्रानें मातापितरांची सेवा क- रावी हा जो मुख्य धर्म, त्यापासून मला भ्रष्ट करण्या करितां मला असें अशक्त केलेंस, यापेक्षां तुझा निर्दय पणा तो कोणता? अरें तृषेनें प्राण जाण्याचा समय आला तरी उदक मिळूं नये काय? असो, पुढच्या जन्मीं शपथपूर्वक तुझा संबंध ठेवणार नाहीं. एका जन्मांत काय सूड उगवून घेणें असेल तो घे." हा सर्व विलाप रोहितानें जरीं मनाच्या मनांत केला, तरी त्याची ती केवीलवाणी मुखचर्या, त्याचें दुःख व्यक्त करून दाखविण्यास मागें सरली नाहीं; तिजवरूनच हरिश्चंद्र व तारामती, या उभयतांस त्याची तान्हेली अवस्था समजून राजा तत्काल उदक शोधार्थ निघाला. तारामतीनें आपल्या पायांवर रोहितास उभें करून आपण त्याजवर छाया करण्यासाठीं ओणवी उभी राहिली. मातेची ही आपणावि- षयीं ममता पाहून रोहिताचें मन दुःखित होऊन तो तत्काल ए- कीकडे झाला व ह्मणाला; आई, असें करून का काळ लोटणार आहे? कोठें तरीं छायेस चल ह्मणजे दोघांसही सुख होईल" **दुःखावर डागण्या** ह्मणून एक प्रचारांत ह्मण आहे, त्याचप्रमाणें

* विश्वामित्रानें आपल्या तपः सामर्थ्यानें सूर्यास पूर्ण द्वादश कलांनीं तपण्याची आज्ञा केली होती असी लोकांची समजूत आहे.

तारामतीची रोहिताच्या या भाषणानें अवस्था झाली. तिणें त्याला उचलून पोटाशीं धरलें आणि अगदीं मोकळ्या स्वरानें रडण्यास प्रारंभ केला; हाय हाय!! काय बरें त्यावेळीं [illegible] झालें असावें ? तिच्या विलापावर एका कवीनें एक सुंदर पद केलें आहे, ते असें.——

**पद.**

( बहुता दिवसीं मज दुर्लक्षिलें या चालीवर. )

हर हर देवा पुराण पुरुषा, अतर्क्य तुझिही कृती ॥ कसे तिज अज्ञ लोक जाणती? ॥ १ ॥ न्यायी, पालक सर्व जगाचा तू तें कवि बोलती ॥ परीहि आवडली कीं रिती ॥ २ ॥ सद्भक्तांतें दुःख मुक्त तूं करिसी ऐकूं श्रुती[1] ॥ केंवि बा कुंटित झाली मती ॥ ३ ॥ जरि हें संकट ना हरिसि तरी कलंक हा निश्चिती ॥ बिरुदा लागल कीं श्रीपती ॥ ४ ॥ चाल ॥ धाव बा करुणेच्या आगरा, सोडवी दुःखांतुन पामरा, करी बा केरि[2]मोक्षा परित्वरा ॥ उठाव ॥ अतां नाहिं बा धीर नियत कीं, व्याकुल झालों अति ॥ धावरे सखया लक्ष्मी पती ॥ हे भगवंता पतित पावना सदया पातकहृति[3] ॥ करूनी रक्षी दीना प्रती ॥ ध्रु० ॥ हाय बाळ हा काय जळाविण भगवंता शोषला ॥ न्याय कीं तुज लागीं वाटला ॥ १ ॥ चक्रवर्ति नृप पुण्यशीलसा कीर्ति ध्वज लागला ॥ कसारे नाहिं तुवा पाहिला ॥ २ ॥ सत्कर्मानें वर्तत असतां पावे संकट फला ॥ जगीं बा कोण मानिया तुला ॥ ३ ॥ चाल ॥ नाहि बा सुख

---

१ कानानीं. २ गजेंद्र मोक्षाप्रमाणें ३ पातकहरण.

दु:खाला भित, असें हें तुमचेंची अनहित, जगीं या पडेल उलटी रित ॥ उठाव ॥ दुराचारचीं पुण्य मानुनी लोक पुढें वर्तती ॥ पाहिरे नामाची दुर्गती ॥ हे भग०॥ २ ॥ जें महाराजातें वंदाया नृप पंक्ति धावती ॥ वहु तशा करभारा अर्पिती ॥ १ ॥ महर्षि गणही बहु प्रेमानें वदनिं धन्य बोलती ॥ देवगण सुमनांतें[४] वर्षती॥ २ ॥ ज्याच्या नामा ऐकुनि पापें अन्य मार्ग पाहती ॥ रोगही थरथरूनि कापती ॥ ३ ॥ चाल ॥ तोचि हा हरिचंद्र नृपवर, हिंडतो उदकार्थी भूवर, नये वा तुजसी कीं गहिंवर ॥ उठाव ॥ अहा निर्दया कपट खने तव व्यर्था बिरुद स्फिर्ती[५] ॥ कासया ह्मणवीसी जगपती ॥ हे भगवंता० ॥ ३ ॥

( मुलाच्या तोंडावरून हात फिरवून. )

काय करूरे नयेचि करुणा कोणातेही तुझी ॥ बुडाली नीति समुद्रीं अजी ॥ १ ॥ रक्तवर्ण आणि घर्म बिंदु हे पाहुनि तव मुख कंजी[६] ॥ तोडितें तडतड कीं का-ळिजीं ॥ २ ॥ माता पितरें न होचि वैरी झालों तुज सहजीं ॥ बालका शोकातें वा त्यजी ॥ ३ ॥ चाल ॥ धरी वा भगवत्ध्याना मनीं, नाहिं वा सार दुसरें जनीं, कोणता अजरामर मेदिनी ॥उठाव ॥ परोपकारासाठीं घडावें प्राण दान निश्चिती ॥ स्मरें वा निरवीध सोह स्थिती ॥ हे भगवंता० ॥ ४ ॥

---

पुढें. ५ प्रीती. ६ कमळ. ७ जरा मरण रहित. ८ सांगे जगास ... ९ ...
मा नीत सो गळां ...

याप्रमाणें तारामति विलाप करीत आहे, इतक्यांत मोठी वावट-ळ सुटली. जिकडे तिकडे धूळच धूळ होऊन गेली. इतका वेळ-पर्यंत बालक रोहित जवळ होता; परंतु या वावटळीमध्यें तोहि एकीकडे गेला. तिघेंही परस्परांच्या आरोळ्या मात्र ऐकून घाब-ऱ्यां घाबऱ्यां एकमेकांपाशीं जाण्याचा यत्न करीत होतीं; परंतु वावटळीमुळें त्यांचा उपाय कांहींच चालेना, ज्या वावटळीमध्यें पर्वतही तुटूं लागले, तेथें या सुकुमार मनुष्यांचा काय पाड? असो, याप्रमाणें कांहीं वेळ झाल्या नंतर वावटळ शांत झाली; त्रिवर्ग परस्परांस शोधिताहेत; परंतु कोणास कोणाचा पत्ता लागेना. अशा संकटांत हें राजकुटुंब आहे इतक्यांत एक सुंदर बाग व त्यामध्यें अन्नसत्र व प्रपा ( पाणपोयी. ) असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तारामति पतिपुत्रांचा शोध करीत असतां त्याच मार्गानें आली. तिला पहातांच अन्नसत्र व प्रपा घालणारा ब्राह्मण पुढें आला; त्याणें तारामतीच्या सौजन्याची, पातिव्रत्याची व श्रमित मुद्रेची पुष्कळ स्तुति करून क्षणमात्र विश्रांति घेण्यास व अन्नोदक ग्रहण करण्याविषयीं प्रार्थना केली; परंतु तारामति धर्मभीरु व पतिव्रता असल्यामुळें स्थलाचा व पतीचा शोध लागल्यावांचून तिच्यानें तें मान्य करवेना! तिणें त्यास आपलें नांव गाव सांगून प्रश्न केला कीं: “महाराज, आपण कोण, या अरण्यांत कशासाठीं रहातां, अन्नोदक ग्रहण करण्याविषयीं आग्रह करितां याचें कारण काय? आणि माझे पति पुत्र या मार्गानें गेले असल्यास त्यांचा शोध एवढें कृपा करून सांगा ह्मणजे मला सर्व आतिथ्य पावलें.” तारामतीचा प्रश्न ऐकून ब्राह्मणास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें, तरी तारामतीस कसोटीस लावण्याची त्याची आशा कमी झाली नाहीं. प्रारंभीं त्यानें हें अन्नसत्र व प्रपा, प्रवासी लोकांकरितां मी घातली

आहे, असें सांगितलें. इतके शब्द कानीं पडतांच तारामती मार्ग क्रमूं लागली आणि ह्मणाली; † " महाराज, असें आहे, तर या ठिकाणचा बाराही क्षत्रिय स्त्रीला आणि त्यांतूनही हरिश्चंद्राच्या धर्मपत्नीला उपयोगी नाहीं. आतां अनुग्रह करावयाचाच असेल, तर माझे पति पुत्र आपण पाहिले असल्यास त्यांचा शोध सांगावा." तारामतीचें हें निःशिम भाषण ऐकून त्या ब्राह्मणाचा कंठ सद्गदित झाला, तरीं आपल्या स्वभावाप्रमाणें आग्रह सोडणें त्यास बरें वाटलें नाहीं. त्याणें लागलाच भोजनास बसलेला असा मायावी हरिश्चंद्र निर्माण करून तारामतीस दाखवून ह्मटलें, "साध्वि, तुझी वृत्ति पाहून फार समाधान झालें, पण मनुष्यावर प्रसंग येईल, त्याप्रमाणें वर्तन करावें हेंच योग्य ! तूंच पहा बरें ! राजा हरिश्चंद्रासारखा सत्वधीर कोणी तरी आहे काय? (बोट दाखवून.) पण तो पहा, भोजनास बसला आहे कीं नाहीं तो! तूं त्याची धर्मपत्नी, ह्मणून तुला दाखविला. आतां तुला भोजन करण्यास कोणता बरें प्रत्यवाय आहे?" ब्राह्मणाचें हें वाक्य ऐकून तारामतीस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें; तथापि सत्वरक्षणाकरितां राजास प्रत्यक्ष पहात असतांही आंत प्रवेश न करितां "कांहीं असो, आपण आपल्या धर्मानें वागावें;" इतकें बोलून इकडे तिकडे न पहात चालती झाली.×

वाचकहो, सुशिक्षित स्त्री असल्यापासून फायदा कोणता, याचें प्रत्यंतर घेण्यास तारामतीचें उदाहरण फार उत्तम आहे. असो, याप्रमाणें ब्राह्मणास प्रत्युत्तर देऊन तारामती कांहींशा अंतरावर

---

† अन्नसत्रांतील भोजन व पाणपोयींतील उदकप्राशन यांपासून पुण्यक्षय होतो व सत्वनाश होतो असें भागवतांत वर्णिलें आहे.

× तारामतीच्या पूर्वी हरिश्चंद्र व मागून रोहित, असे दोघे याच मार्गानें गेले व त्यांना अन्नोदक घ्यावें ह्मणून या ब्राह्मणानें प्रयत्नही केला; परंतु त्याणींही त्याचा स्वीकार केला नाहीं.

जाऊन पोंचली नाहीं तोंच संपूर्ण अरण्यास वणवा लागल्याचें तिच्या दृष्टीस पडलें. अहाहा ! वाचकहो, असा प्रसंग प्राप्त झाल्यावर मनुष्याचें धैर्य काय बरें उपयोगी आहे ? असो, राजा व रोहित हे दोघेही कोठें दिसत नाहींत असें पाहतांच तारामती नानाप्रकारें-करून विलाप करूं लागली, "परमेश्वरा, आह्माला दुःख देण्याचा तुझा उद्देशच जर होता, तर आह्माला प्रारंभीं वचनमुक्त तरीं करावयाचें होतेंस ? मी कांहीं तुझी निंदा करत्यें किंवा तुला दोष देत्यें असें नव्हे, पण तूंच विचार कर; प्राणांतापेक्षांही दुःसह जें वचनोल्लंघन, त्याचें, सूर्यवंश मुकुटमणि महाराजांच्या हातून कसें बरें सहन होईल? अरे, स्त्रिया ह्मणजे स्वभावतः पापी असतात हें जरीं खरें आहे, तथापि पुण्यश्लोक महाराज इतक्या शिक्षेस पात्र असतील, असें कालत्रयींही ह्मणतां येणार नाहीं. अहाहा! परमेश्वरा, न्यायसभेमध्यें जीं प्रसिद्ध प्रत्यंतर प्रमाणें सिद्ध होतात, तेवढ्यांवरूनच न्यायाधीश शिक्षा देत असतो, मग विवेक शमदमादिकांच्या साक्षीनें न्याय करणाऱ्या तुझ्या सभेंत अन्याय कसा बरें घडावा ? संपूर्ण जगास पूज्य व ग्राह्य, अशा महाराज हरिश्चंद्रास अकालीं, कुस्थलीं, अपघातानें आणि वचनोत्धाराच्या विचारांत असतां मृत्युपंथास नेल्यापेक्षां अन्याय तो कोणता ? अहाहा ! प्रारब्धा ! तुझी गति अतर्क्य आहे. अरे, स्वप्नांतील गोष्टींचा असत्याच्या प्रत्यंतरास दाखला देत असतात, अशा स्वप्नांत केलेलें दान कबूल करून ज्याणें संपूर्ण राज्यावर तुलसीपत्र ठेविलें, ज्याणें कोणत्याही सौख्याची आशा बाळगिली नाहीं, ज्यास राजासन प्राप्त झाल्यापासून अन्यायाचा स्पर्शही झाला नाहीं, परोपकार, भूतदया, भगवद्भक्ति आणि सदाचार यांचा ज्याच्याशीं वियोग झालाच नाहीं, असा लोकैकपुण्यश्लोक राजा हरिश्चंद्र, वचन रक्षणाकारितां प्रयत्न करीत असतां या वणव्यामध्यें सांपडावा काय ? अरे दुष्ट अंतःकरणा, सर्व जगास संतोषविणारें जें राजजीवित, त्याविषयीं अशी कुत्सित कल्पना तरीं कशी उद्भवली ? छिः ! ईश्वर कांहीं इतका

मूर्ख नाहीं, त्याला सारासार विचार, सदसद्विचारशक्ति, मनुष्याची निवड, इत्यादि गोष्टी फार चांगल्या समजतात, तेव्हां त्यास महाराजांची ओळख नसेल असें कल्पांतीं घडणार नाहीं. ( राजास अनुलक्षून. ) महाराज, आपल्या तपःसामर्थ्यापुढें ह्या यःकश्चित् अग्नीची कथा ती काय? हातांत धनुष्य बाण घेऊन पर्जन्यास्त्राचा प्रयोग करून याचा संहार करण्यास आपणास अशक्य आहे काय? नाहीं, हें मी खात्रीनें सांगत्यें. मग कां बरें तसें करीत नाहीं? अथवा निरपराध कोणास शासन करावयाचें नाहीं ह्मणून आपण स्वस्थ बसलां आहां? अथवा, अग्नि हें क्षत्रियांचें मुख्य दैवत ह्मणून त्याच्याच इच्छेप्रमाणें वागण्याचा निश्चय केला आहां? अथवा या पातकी अरण्यांतून फिरण्यास आपलें मन प्रशस्त होईना ह्मणून त्यास हें प्रायश्चित्त देत आहां? अथवा आपलें पुण्य तेज सर्वांस समजून सन्मार्गानें वागण्याचा त्यांस उपदेश मिळावा ह्मणून आपल्या तपस्तेजापासूनच ही अग्निज्वाला निर्माण केली आहे? अथवा स्त्री हें पुरुषाच्या परम सुखाचें बंधन, असें समजून तें तोडून टाकण्यासाठींच हें अग्निरूप घेतलें आहे? अथवा परमेश्वराचें स्पष्ट रूप जें अग्नि, त्यांत आपण लीन होऊन मलाही तीच आज्ञा करण्याकरितां हा अग्निदूत पाठविला आहे! महाराज, प्रत्युत्तर तरीं द्याहो! महाराज, सर्व भूतांस आपलें अभय वचन असतां माझाच कां बरें त्याग करितां? प्राणेश्वरा, धर्मपत्नीचा त्याग केल्यानें जितका सूर्यवंशास कलंक आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपासून नाहीं, याचा तरीं कांहीं विचार करा!! (पुत्रास उद्देशून.) बा रोहिता, तुलाही माझा त्रास आला काय? अरे, तुजसारख्या ज्ञानी पुत्रास अरण्यवासामध्यें दीन मातेचा त्याग योग्य वाटला काय? बाळा, क्षत्रियाचें मुख्य कर्तव्य जे परोपकार, अनाथरक्षण, दुष्टनाशन आणि आईबापांची सेवा, तें केल्यावांचून तुला स्वर्ग लोक कसा रे आवडला? अथवा असें घडेल तरीं कसें? ज्याच्या नांवाला इंद्रादिदेव मान देतात, त्या पुण्यश्लोक राजाचा पुत्र आणि महा

धार्मिक वत्स रोहित, सर्व कर्तव्यें केल्यावांचून परलोकास जाईल, अशी दुष्ट कल्पना तरी कशी उद्भवेल? खरोखर, धर्मज्ञा रोहिता, असें तुजकडून कधींहि घडावयाचें नाहीं, पण मी केव्हांपासून आक्रोश करितें, तरी तुला कशीरे दया आली नाहीं? अथवा ही माझीच चूक आहे! बाळा, चिमकुलें धनुष्यबाण हातांत घेऊन आपल्या पित्यास ब्राह्मणाच्या ऋणांतून मुक्त करण्याकरितां कुबेरावर स्वारी तर केली नाहींसना? होय! यांत तुला अशक्य तें कोणतें? मत्त हत्तीचें गंडस्थल विदारण्यास सिंहाच्या तान्ह्या छाव्यास काय अगाध आहे? विजयी हो, कुमारा विजयी हो! तुझे पूर्वज तुला आपल्या अमोघ शक्ति अर्पण करोत, तुझ्या पित्याचें तीव्र तेज आणि तपःसामर्थ्य तुला सहाय करो! तुझ्या मातेचें पातिव्रत्य तुला श्रमरहित करो! भगवान् सूर्य नारायण, आपलें प्रखर तेज तुज-मध्यें प्रकाशवो! विजयी हो, बाळा, विजयी हो! (विचार करून.) मना, कितीरे तूं चंचल आणि मोहित आहेस? अशा या भयंकर अग्नीच्या भडक्यामध्यें महाराज आणि बालक जीवंत राहतील, ही संभवनीय तरी गोष्ट आहे काय? बाबा, आजच सूर्यवंशाची समाप्ति; असें नसतें, तर या कुटुंबाचा पूर्वज धडधडीत प्रकाशित असतां त्याणें कांहींचका सहाय केलें नसतें? अरे फार कशाला! सहाय करण्याचें तर दूरच, पण आपल्या वंशांतील सुशिक्षित अर्भक पादचारी गमन करीत आहे, हें प्रत्यक्ष पाहूनही ज्या निर्दयानें आपल्या पूर्ण किरणांनीं तपण्यास आळस केला नाहीं, त्याला वंशाची चाड ती काय? फार उत्तम आहे! पूर्वजा आदित्या, आज वंशच्छेद करून सुखरूप हो! यापुढें तुझ्या नांवानें आहुति दे-ण्यास किंवा तुझें नांव चालविण्यासही वंश राहिला नाहीं, आतां क्षीण पुण्य झाल्यावर मृत्युलोकचें सुख अनुभविण्यास तयार हो! तुझा तरी काय उपाय? "बुद्धिःकर्मानुसारिणी" जसें भवितव्य असेल, त्याचप्रमाणें बुद्धि उपजावयाची! रविवंशाचा शेवट हो.

ण्यांचाच जर परमेश्वरी संकेत असला, तर तेथें कोणाचा उपाय आहे? बरें असो, झाली गोष्ट पुनः येत नाहीं. ईश्वरी तेजाच्या ह्या अग्निज्वाला, मला सत्वशील महाराज हरिश्चंद्राकडून पाचारण आल्या आहेत, तर मी आपली अंतर्ज्योति त्यांच्या स्वाधीन करत्ये. भगवन् विश्वनेत्रा, तूं सर्व जगाचा साक्षी आणि या मनुवंशाचा पूर्वज आहेस यासाठीं तुला ही शेवटची प्रार्थना करत्ये कीं, या देहाच्या हातून जे अपराध घडले असतील, त्या सर्वांची क्षमा करून शुद्धरूप अंतरात्म्यास आतां सुख दुःख व जन्म मरण भोगावें लागणार नाहीं अशीच जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं साक्षी दे. या देहाचा शास्त्रविहित पति, स्वर्गमार्गीं अंतरात्म्याची वाट पहात आहे, (अर्धांगी स्त्री ह्मणून एकट्यास गति नाहीं.) तर आतां मी आज्ञा घेत्यें." असें ह्मणून पतिव्रतेनें किंचित् नेत्र झाकून परमेश्वराची प्रार्थना केली आणि सर्व विकारांचा वेग अवरोधुन अग्नीजवळ आली आणि हात जोडून ह्मणत्ये.—

## दिंडी.

घेइ पोटी हे प्रभो जातवेदा[१], नाणि मानें वा सतिदाह[२] पापखेद ॥ यज्ञनेयोगें[३] आजवरि तोषलास, आज घेई मिष्टसा तनुग्रास[४] ॥ १॥ जिये ज्वाले नृपराज भक्षियेला, सानें[५] बालकही जिणें न पाहिला ॥ तीच ज्वाला प्रकटून करी राख, धूतपापा होउंदे कीर्ति चोख[६] ॥ २ ॥

१ अग्नि. २ दहन. ३ हवन--यज्ञ. ४ शरीर. ५ लहान. ६ निष्कलंक--स्वच्छ.

याप्रमाणें प्रार्थना करून ज्वालेंत प्रवेश करणार, इतक्यांत चमत्कारिक रीतीनें अग्नि शांत झाला. हा चमत्कार पाहून तारामतीस आपल्या पति पुत्रांच्या जीविताविषयीं बराच धीर आला; तिणें तत्काल अगाध कर्तृत्वाविषयीं परमेश्वराची प्रार्थना करून पूर्व क्रमाप्रमाणें "महाराज, महाराज, रोहिता, बाळा रोहिता," ह्मणून मोठ्यानें हाका मारीत मार्ग क्रमण्यास प्रारंभ केला. पुनः चालतां चालतां कांहीं अंतरावर गेल्यानंतर तारामतीस मरण प्रायदुःखानें गाठलें. मार्गामध्यें हरिश्चंद्र आणि रोहित, यांचीं प्रेतें तिच्या दृष्टीस पडलीं, मग काय विचारतां? पतीला खोकला आला असतांही जी साध्वी कासाविस होई, तिणें प्रत्यक्ष पतिप्रेत पाहिल्या नंतर कसा आक्रोश केला असेल, याचें यथातथ्य वर्णन करण्यास बिचारी भाषा कोठून समर्थ असणार? प्रेतें अग्रभागीं पाहिल्यावर तारामतीस मूर्च्छा आली. कांहीं वेळानें सावध होऊन पाहत्ये तों आपला पति आणि सुकुमार बालक, परस्परांस प्रेमालिंग देऊन मृत झालेले पुढें पडले आहेत. अहाहा! काय दुःख हें? काय सुशील साध्वीवर प्रसंग हा? धन्य त्या पतिव्रतेची! दुसरा असतां तर केव्हांच सत्वभ्रष्ट झाला असता. असो, तारामतीनें दोन्ही शवें मांडीवर घेऊन पुनः विलापास प्रारंभ केला.—

## पद.

( उद्धवा शांतवन कर जा या चालीवर. )

**दीननाथ शरणशरण्या, विश्वेश्वर करुणागारा[1] ॥ ध्रु० ॥**
**नृपराज सत्वखनि[2] पाता[3], पृथ्वीचा हा प्रभुराया, स्वप्रांत**

---

१ करुणास्थान. २ सत्वखाण. ३ पालक.

देउनी दाना, पावला गतिही सदया, ऐकुनि ही लोकीं ख्याती[1] होइल कीं मुनिजनगेया[2]! ॥ चाल ॥ वदनी मुनिनृपर्षि[3] जासी, भिववी यद्भय[4] कालासी, तोची हा सुकृ[5]तराशी, शर्वरूपी[6] जगदुद्धारा ॥ दीन० ॥ १ ॥ हा दुष्टा हा प्रारब्धा हा मूढा हा विधिरेषे, काय हें लिहिसी भालीं कोणत्या संचित दोषें, दाविसी आत्मविभवांसी[7] येउनियां ऐशा वेषें ॥ चाल ॥ जें तूज उचित[8] तें केलें, जगताच्या सौख्या नेलें, विश्वासि तेज दावीलें, मज ढकलुनि दुःखगारा[9] ॥ दीन० ॥ २ ॥ हा प्राणवल्लभा नाथा, हा शूरा हा रणधीरा, हा दीनसख्या करुणेच्या, भांडारा हा गंभीरा, हा नाथ हाक मारितें, नेत्रां तुनढालुनि नीरां[10] ॥चा०॥ तरि कैसा निष्ठुर होसी, प्रत्युत्तर ही ना देसी, हृदि[11] कवळुनि कां ना घेसी, सत्यसंध चित्सुखसारा[12] ॥ दीन० ॥ ३ ॥ हा बाळ रोहिता वत्सा, कुलदीपा हा सच्छीला[13], हा मुग्ध हा सुकुमारा बोलबा बोबड्याबोला, ही माय नव्हे तव शत्रू पाहेवा उघडोनि डोळा ॥ चा० ॥ सुपुत्र तूं असता केवी, त्यजुनी मज, कुसुतां[14] जेवी, जासी ये जननी सेवी, निजधर्मापरि तुं उदारा ॥ दीन० ॥ ४ ॥

[ पु० चा० ]

---

१ प्रसिद्धि. २ मुनींनीं गाण्यासारखी. ३ राजांतील ऋषि. ४ ज्याचें भय. ५ पुण्य ६ प्रेम ७ ऐश्वर्य. ८ योग्य. ९ दुःखगृहांत. १० जल. ११ पोटाशीं. १२ ज्ञानम सत्वाचें सार. १३ सदाचरणी १४ कुपुत्राप्रमाणें.

# तारामति.

यांप्रमाणें तारामती आक्रोश करीत आहे, इतक्यांत एका व्याघ्रानें दोन्ही प्रेतें ओढून नेलीं. अहाहा ! त्यावेळीं तारामतीची अवस्था काय विचारावी ? तिणें हृदय बडविलें, केश तोडले, गडबडां लोळूं लागली, मुखांत धूळ घातली, असा नाना प्रकारानें विलाप केला. व्याघ्रास धरण्यासाठीं त्यावेळीं तिला इतकें चापल्य आलें कीं; जाळी, कांटे, खांच, टेकाड, इत्यादि काहींच तिच्या दृष्टीस पडेना. आतां आपलें कोणीं नाहीं, वैधव्यांत आणि अधर्मांतच आतां वांचलें पाहिजे, अशी जेव्हां तिची खात्री झाली; तेव्हां तिणें एक मोठा पाषाण धरून त्यावर मस्तक आपटून प्राणहानि करण्याचा निश्चय केला. इतक्यांत "प्रिये, प्रिये, साध्वि, तारामती" असा हरिश्चंद्राचा ध्वनि तिच्या कानीं आला. हा शब्द कोठून झाला, या विचारांत ती आहे, इतक्यांत हरिश्चंद्रानें येऊन तिला आलिंगन दिलें. पतीचा स्पर्श होतांच तारामती नेत्र उघडून पहात्ये तों पुण्यशील हरिश्चंद्रमूर्ति बालक रोहितासह तिच्या दृष्टीस पडली. मग त्या आनंदास काय पारावार आहे ? असो, परस्परांनीं परस्परांस आपापल्या हकीगती सांगितल्यामुळें वणवा लागला वगैरे सर्व प्रकार इंद्रजाल, असी त्यांची खात्री होऊन परमेश्वर स्मरण करीत तिघेही मार्ग क्रमूं लागले.

अज्ञान लोक पेशवाईंत ब्राह्मणांनीं जो उन्माद केला त्याला हसतात, पण ही त्यांची चूक आहे. भिक्षुक ब्राह्मणाचें शीलच तसें चमत्कारिक आहे, हें या राजकुटुंबाच्या अपेष्टेवरून अगदीं स्पष्ट होतें. राजा हरिश्चंद्र भार्यापुत्रांसह वाराणशींत प्रवेशतांच त्यांच्यापुढें दक्षणा मागणारा ब्राह्मण दत्त ह्मणून उभा राहिला. त्यास पहातांच त्रिवर्गांनीं मोठ्या मर्यादेनें प्रणाम केले, पण त्यांस आशीर्वाद देण्याचें सोडून त्या दुष्टानें एकदम गालिप्रदानास

आणि त्रागयास प्रारंभ केला. ब्राह्मणाचा त्रागा पाहून राजा फारच भयभीत झाला. त्याणें मोठ्या लीनतेनें हात जोडून प्रार्थना केली कीं; "महाराज, मी प्रारंभीं सात दिवसांचा अवधी मागूनच घेतला होता, तो आज सातवा दिवस आहे. आतां या विश्वेश्वर नगरीमध्यें आह्मी आपल्या देहांचा विक्रय करून आपलें दक्षिणा ऋण समर्पण करितों." राजा इतकें दीन मुद्रेनें बोलला, तरीं त्या पाषाणहृदयास तिलमात्र द्रव आला नाहीं; त्याणें आपला त्रागा चालविलाच. त्यावेळीं पतिव्रता तारामतीनें सांगितलें कीं; "आम्हावर आपला विश्वास नसेल तर आपणच आमचा विक्रय करावा, आह्मी सिद्ध आहों." इतकें झालें तरीं भटाची रिपरिप मोडली नाहीं. शेवटीं "पाहिजे त्यास विका, पाहिजे तें काम करूं" असा तिघांचाही करार करून घेऊन तो त्यांसह बाजारांत येऊन एका पारावर बसला. तिघांच्याही मस्तकांवर विक्रय चिन्हें पाहून लोकांस अतिशय वाईट वाटलें. जो तो ब्राह्मणास शिव्या देऊं लागला. लोकांनीं शिव्या दिल्या तरी त्याचें फळ या धर्मभीरु राजासच प्राप्त झालें. ब्राह्मण पुनः संतापून ह्मणूं लागला कीं; "अधमा, हा पहा तुजकरितां माझा उद्धार होत आहे." असें ह्मणून त्याणें त्रिवर्गांसही ताडण केलें. तेव्हां हरिश्चंद्रानें लोकांस प्रार्थना केली कीं; "महाराज, आमचा विक्रय आह्मीच करीत आहों, व्यर्थ ऋषीश्वरास कां दोष देतां?" राजाचें हें गंभीर भाषण ऐकून सर्वांस अतिशय दुःख झालें; तथापि आपल्या कळवळ्यापासून त्या पुण्य श्लोकासच क्लेश होतात असें समजून सर्वांनीं द्वारें बंद करून घेतलीं. तरीं ब्राह्मणाचा त्रास आहेच. तो म्हणाला; "दुष्टा हरिश्चंद्रा, सर्व लोकांस खूण करून दारें लावविलींस, आतां येथें विकत घ्यायला येणार कोण आणि माझी दक्षिणा मला मिळणार कशी?" असें ह्मणून पुनः त्यांस मारूं लागला. इतक्यांत तारामतीच्या रूपाची आख्या ऐकून कांहीं कुंटिणी तिला घेण्यासाठीं आल्यामुळें भटजीबावा

सवद्याकडे गुंतले. कुंटणीनीं तारामतीस पहातांच मनांत इतक्या आनंदल्या कीं; ती विकत मिळणें हें त्रैलोक्याच्या राज्यापेक्षांही अधिक असें त्यांस वाटूं लागलें. त्यांणीं लागलीच तारामतीची किंमत विचारिली. त्याणें कपाळास आठ्या घालून सांगितलें कीं; "पहा! तुह्मी घेत असाल तर घ्या, आमची कांहीं ना नाहीं, पण ही पांढऱ्या पायांची आहे. आतां उगीच ओली कोरडी भाकरी आणि जाडें भरडें वस्त्र तरीं मिळवित आहों, इच्या पायगुणानें तें सुद्धां मिळावयाचें नाहीं. असो, घ्यायची असेल तर एक कोट मोहरा द्या आणि घेऊन जा. आमचें काय? द्रव्य पदरीं पडून गळा मोकळा झाला ह्मणजे झालें." ब्राह्मणानें जरीं इतकें सांगितलें, तरीं कुंटिणीची त्या कमलिनीवरची आसक्ति कमी न होतां त्यांणीं तत्काल द्रव्य देण्याचें कबूल करून आणावयास पाठविलें. आतां आपला कुंटिणीच्या घरीं विक्रय होणार अशी जेव्हां तारामतीची खात्री झाली, तेव्हां तिणें परमेश्वराचा स्तव करून अगदीं दीन मुद्रेनें व करुणस्वरानें ब्राह्मणाची प्रार्थना आरंभिली.—

## पद.

( वल्कल वेष्टित काया, असतां या आनंदांत उपवनीं ॥ या चालीवर )

**रविवंशाच्यामध्यें न झाला सत्वभंग आजुनी, आजि काय तो होउं पहातो होउनि मी कुंटिणी ॥ शुद्ध देह हा कसा लागे दुष्कर्माच्या पथा, ऐकून कविजन बहु दुःखानें सांगल तर्कीं कथा ॥ अभिषिक्ता[१] मी असें विधीनें[२] चक्रवर्तिकामिनी[३], केवि घडे तद्धस्तें[४] कुंटणपण हें दुष्कृतखनी[५] ॥चाल॥ ऋषिराज करावी दया, दावा जनासी नया[६], अपकीर्ति पाववी लया ॥ वाग्ब[७]-**

---

१ अभिषेकझालेली. २ शास्त्रानें. ३ स्त्री. ४ तिच्या हातानें. ५ पापाची खाण. ६ न्याय. ७ वचनानें बांधलेली.

ह्मा मी खरी तरीं बा दीना विनवीतसें, योग्यस्थानीं विक्रय करणें हेंची प्रार्थीतसें ॥ ध्रु० ॥ वचनाच्या रक्षणा खरतर भोगितसों आपदा, ऐकुनि आज्ञा स्तविति सारे हर्ष होय कोविदां[१] ॥ परि जो वेदाक्षरी भवदृश[२] हस्तीं अभिषेचिली[३], बहुविध यज्ञीं यजमान स्त्री होऊनियां बैसली ॥ पुरवील्या कामना जिणें कीं दीनाच्या तातडी, त्या राणीनें कुंटिण व्हावें गोष्ट फार साकडी[४] ॥ चा० ॥ दुर्भाग्य निश्चयें असें, सुकृता दोष येतसे, वाटतें योग्यकीं कसें ? ॥ श्रीऋषिराया दोनी चरणीं मस्तक ठेवीतसें ॥ योग्यस्थानीं० ॥ सर्वव्यापक आत्मा एकचि कैंची सति कुंटिणी, ह्मणाल ऐसें तरि भवनाशा माया भवगुंठिणी[५] ॥ देह हाचि कीं आत्मा मानुनि करणें दानादिही, सर्व ब्रह्मसी केवि कल्पना बाणे मानवीति महीं[६] ॥ तनुविक्रय जाहल्या करणें लागेल पातक, दुष्टाचरणें केवी रोषे सांगा व्यापक ॥ चाल ॥ मी तरीं दासि तुमची, निरवधी असें शुद्धची, मळतसे देह हा शुची[७] ॥ भवदाज्ञेनें[८] तरि पापहें नपडे त्वच्छिरिं[९] कसें ? ॥ योग्यस्थानीं० ॥ ॥३॥ न वदे मी आन कीं एकची परिसावी विनवणी॥ कुंटणपण मी केल्या लौकिक काय होय मुनिगणीं ॥ कुलस्त्रियांच्या दोषें संकर वर्णि होत त्रिभुवनीं, प्रलयाकारण तेंचि मुख्य कीं सांगितलें बुधजनीं[१०] ॥ विश्वाणन[११]दक्षिणेसाठीं नृपपत्नी लागुनी, एक्या मुनिनें विकुनी केली कुलयोषित्[१२] कुंटिणी ॥ चाल ॥ इह[१३] दोषि तुह्मी अन्यकीं? वाटत्यें करणि धन्यकीं ? मी तरी

१ विद्वान. २ तुमच्यासारख्या, ३ अभिषेकीली. ४ दुःखाची. ५ संसारानें द्विणारी. ६ पृथ्वीवर. ७ पवित्र. ८ तुमच्या आज्ञेने. ९ तुझ्याथार्मी. १० विद्वानांनीं. ११ दान. १२ कुलस्त्री. १३ इथे ( या गोष्टींत )

**असें मान्यकीं ॥ आज्ञा शिरसा वंदुनि ज्ञात्यें विकल्प किमपि नसे ॥ योग्यस्थानीं० ॥ ४ ॥**

याप्रमाणें तारामतीची प्रार्थना ऐकतांच ब्राह्मण जरी छळास प्रवृत्त झाला होता, तरी त्याचें मन द्रवलें. कंठ सद्गदित झाला, अंगावर प्रेमरोमांच उद्भवले, वाणी निर्व्यापार झाली. तसेंच कुंटणीचें मन जरी तिजवर लुब्ध झालें होतें, तरी त्यांसही तिजविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. आणि त्यांतील एका वृद्धेनें तारामतीस हात जोडून सांगितलें कीं; "बाई, सत्यसत्य पतिव्रता आहेस. तुजसारख्या जर कांहीं पतिव्रता नसत्या, तर खरोखर विश्वप्रलय घडला असता ! असो, आह्मी तुमचें मोल करून या नीच धंद्यास विकत मागितलें, याबद्दल क्षमा करून आह्मावर कृपा करावी. आजपासून देवाची शपथ, आह्मी हा धंदा करणार नाहीं. ईश्वर करो आणि तुजवरें आलेलें संकट नाहींसें होवो." असें ह्मणून निघून गेल्या. या जातांच पुन: ब्राह्मणाच्या तोंडाची टकळी सुरू झाली. तो राजास नानाप्रकारें शिव्या देऊं लागला, तारामतीनें गिऱ्हाईक घालविलें ह्मणून तिला मारूं लागला, वारंवार त्रागा करून आत्महत्या करण्याची भिती दाखवूं लागला ; असा जो प्रकार चालला आहे, तों कालकौशिक नावाचा एक ऋषि या स्थलीं आला व त्याणें विश्वामित्रास एक कोट मोहरा देऊन त्याजपासून तारामतीस विकत घेतलें. आपला विक्रय ब्राह्मणास झाला हें पाहून तारामतीस बरेंच समाधान वाटलें. विश्वामित्रानें तारामतीस सांगितलें कीं; "आतां तूं यांजबराबर जा." त्याबराबर तारामतीनें "आज्ञा प्रमाण" ह्मणून त्यास आणि आपल्या पतीस नमन केलें, आणि ह्मणाली.—"प्राणनाथ, आज मी तर ऋषिऋणापासून मुक्त झाल्यें. आतां हा देह कालकौशिक ऋषीचा होय ; मी आतां आज्ञा मागत्यें. परमेश्वर कृपेनें पुन: दर्शन घडेल तो सुदिन." तारामती बोलत असतां राजा खालीं मान घालून बसला होता, तो तसाच होता.

तारामतीनें ही राजाची अवस्था पाहून तत्काल एकीकडे झाली. तिणें आपल्या एकुलत्या, आवडत्या आणि गुणवान् पुत्राकडे जेव्हां पाहिलें, तेव्हां तिचा ऊर भरून आला. त्याची ती केविलवाणी मुद्रा पाहून तिचें काळीज चरचरां कापूं लागलें, तथापि विवेकानें त्या दुःखवेगाचा अवरोध करून निघण्याचा निश्चय केला. ही निघणार, इतक्यांत "आई, कोठेंगे जात्येस?" असे लाडके शब्द बोलत येऊन रोहितानें तिच्या गळ्यास मिठी मारिली. अहाहा! प्रीति आणि मोह कांहीं चमत्कारिक आहेत. तारामती जरी विवेकी होती, तरीं रोहिताच्या त्या हृदय भेदक शब्दांनीं तिला मोहांत पाडलें. तिनें त्यास उचलून घेतलें, मुखाचें चुंबन केलें, तोंडावरून हात फिरविला, अश्रु पुसले, आणि सद्गद कंठानें ह्मणूं लागली.—"बाळा, तूं उत्तम कुलांत उत्तम पुरुषापासून पतिव्रतेच्या उदरीं जन्म घेतलें आहेस, त्या अर्थी अनीतीचा वारा-ही तुला लागणार नाहीं व आजपर्यंत लागला नाहीं. तर आतां या सर्व अज्ञानाचा त्याग कर. आपणा त्रिवर्गास एका परमेश्वरावांचून आतां कोणी त्राता नाहीं, ही गोष्ट लक्षांत धरून वाग. प्रारब्ध संयोगानें ज्याज्या वेळीं जें जें घडायाचें, तें तें घडल्यावांचून रहात नाहीं हें मर्म लक्षांत ठेव. प्रारब्ध ह्मणजे ईश्वरीच्छा! तिच्या विरुद्ध वागण्यास आपली शक्ति ती किती! तुझें बाल्यवय आहे, तरीं तुझी बुद्धि चांगली आहे, आतां हा सर्व संसारमोह सोडून एका परमेश्वरावर आपल्या सर्व जीविताचा भार ठेव. संसार हा पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें आहे. आह्मी उभयतां प्रस्तुत जरी माता पितरें या रूपानें आहों, तरीं मागील जन्मींची आप-

णास कांहीं स्मृति आहे काय? अथवा पुढें आपण कोण होऊं यांचें आपणास ज्ञान आहे काय? तर हा सर्व परमेश्वरी मायेचा खेळ आहे, निमित्तालामात्र पिता, माता, बंधु इत्यादि ही केवळ शब्दसृष्टी आहे. आदिकारण एक परमेश्वर. तर सर्व जगाला मिथ्या मानून अविनाश, अक्षय्य, अनादि, अनंत असा जो हृदयस्थ परमात्मा त्याचें ध्यान, भजन आणि सेवन करून त्याच्या इच्छे-प्रमाणें प्राप्त झालेलें जें देहविक्रय कर्म, तें झाल्यावर जो तुझ्या या जड देहाला विकत घेईल, त्याच्या इच्छेवांचून याला वागवूं नको! बाळा, ईश्वराच्या ध्यान भजनास अंतराय आणण्यासाठीं निद्रा, क्षुधा, तृषा, मोह, आळस इत्यादि शत्रु अगदीं वाट पहात बसलेले असतात, तर नेहमीं त्यांच्या प्रतिबंधाचा यत्न करीत जा. आतां आपण हा शब्दच उरला नाहीं, तरीं या जड पंचभूतात्म-कावर कालकौशिक ऋषींचें स्वामित्व आहे, ते वाट पहात बसले आहेत तर आतां जातें. सांगितलेल्या गोष्टी मात्र पूर्णपणें लक्षांत ठेव" असें ह्मणून त्याचें चुंबन करून कांहीं एक न बोलतां व मागें न पहातां कालकौशिकाबराबर चालती झाली.

तारामतीनें रोहितास जरी उपदेश केला होता, तथापि मोह हा विकार फार दुस्तर आहे. त्याणें त्याच्या कोमल हृदयास तत्काल झडप मारून घायाळ केलें; तेव्हां त्या मुलानें नानाप्रका-रांनीं शोक केला. त्याणें बापाची व ऋषीची पुष्कळ प्रकारानें प्रार्थना केली, पण उपयोग काय? राजा दुःखातिशय, लज्जा आणि परिणामाची भीति, यांमुळें अगदीं स्तब्ध बसला होता, विश्वामित्र तर याच्या तोंडांतून अक्षर निघालें कीं; त्याणें काठी

उचलीच. अशी स्थिति पाहून रोहिताने परमेश्वरास आळविण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला.—"परमेश्वरा, आह्मी मनुष्यें अज्ञान आहों, आणि मोहादि विकारांचें सहन करवत नाहीं, हा दोष आमचा काय रे? जर तूं आह्मास अंतर्मुख निर्माण करतास, तर आज मजवर रडण्याचा प्रसंग कां बरें आला असता? असो, तुझी इच्छा! अज्ञान मुलास माता हेंच मुख्य जीवन हा जो तुझा सृष्टि-नियम, याचें तूं उल्लंघन करून माझी आणि मातेची ताटातूट केलीस. फार चांगलें. यांतच तुझें कल्याण असो, आतां इतकें तरीं कर कीं, या विरहवेदना सहन करण्यापेक्षां मला एकदाचा मृत्यु दे. अहाहा! विश्वाचें पोषण करण्याचा डौल घालतोस, तर मी विश्वा वेगळा आहे काय? परमेश्वरा, **दीननाथ** हें ब्रिरुद धारण करण्यास लाजच वाटत नाहीं काय? अरे, माता निघून गेली, पिता अगदीं स्तब्ध बसला आहे, ज्याला संपूर्ण देह अर्पण केला, असा दयाशील ऋषि तर भडाभडा काठ्या मारतो आहे, अंतःकरणावर सर्व विकारांनीं आपला अंमल बसविला, इतकी स्थिती झाली तरीं तुझें नाथत्व माझ्या दृष्टीस पडत नाहीं, तर आतां दीन ही संज्ञा तरीं कोणास देतोस! असो, मजवर तुझी अवकृपा आहे, हें पूर्वीच मी समजलों. तर आतां इतकें कर कीं; तुजपाशीं जो निर्दयत्वाचा सांठा असेल तो काढून त्याचा एकदम मजवर वर्षाव कर." रोहिताचें हें भाषण ऐकून विश्वामित्राचेंही मन द्रवलें व त्याणें प्रश्न केला नसतांही मातेस भेटून येण्याची परवानगी दिली.

( पुढें चालेल. )

## तारामती.

कालकौशिकाबरोबर तारामती खालीं मान घालून दुःख करीत मार्ग क्रमण करित्ये आहे, तों आपल्या मुलासारखा शब्द तिच्या कानीं आला; उभें रहातां येईना, कालकौशिकास सांगितलें तर तो रागावेल कीं काय! ही भीति, मुलाच्या दीन स्वरानें मन तर कळवळलें, मनाची धांव मागें आणि शरीराचें गमन पुढें, याप्रमाणें साध्वी संकटांत आहे, तों रोहिताचे शब्द स्पष्ट ऐकूं येऊं लागले.—

## अंजनी गीत.

"आई आई क्षणभरधीरा, धरी करि पाहे दीन कुमारा ॥
जाणिया दुसरा नाहीं थारा, ह्मणुनियां आला ॥ १ ॥

हे चित्तवेधक शब्द तारामती आणि या कालकौशिक या उभयतांनींही ऐकिले. प्रत्यक्ष पुत्राची करुणाध्वनी ऐकत असतांही साध्वीच्या निश्चयांत चल होत नाहींसें पाहून कालकौशिकास फारच आश्चर्य वाटलें आणि सद्गदकंठानें तारामतीस ह्मणाला; "वत्से तारामति, हे करुणास्वर तुझ्या पुत्राचे आहेत असें वाटतें. क्षणभर विश्रांति घ्यावयाची आहे काय?" ऋषीचे हे शब्द ऐकून मात्र तारामतीच्या दुःखसमुद्रास भरती आली, क्षणमात्र तिची बुद्धि अगदीं निरुपाय होऊन गेली, इतक्यांत रोहिताचा अगदींच जवळ शब्द ऐकूं येऊं लागला; तेव्हां मोठ्या प्रयासानें ह्मणाली, "महाराज. पुत्राचा शब्द ओळखून आपल्याजवळ विनंति करीन, तर कदाचित आपणास राग येईल, या भीतीनें मी कांहींच बोलल्ये नाहीं, पण आतां आपली आज्ञा असेल तर क्षणमात्र उभी राहून मुलाची समजूत करत्ये." तारामती बोलत असतां कालकौशिकाच्या नेत्रांतून एकसारख्या धारा चालल्या होत्या व त्या कांहीं केल्या आवरेनात, शेवटीं त्याणें हस्त संज्ञेनें तारामतीस बसावयास सांगून आपण दूर एका झाडाखालीं जाऊन या मायलेकरांचे संवाद ऐकत बसला.

रोहितानें आल्या बरोबर तारामतीच्या गळ्यास मिठी घातली आणि आसवांनीं तिचें सर्वांग भिजविलें. वाचकहो, मनुष्याच्या विवेकसूर्यास पुत्रमोहासारखें दुसरें कोणतें बरें खग्रास ग्रहण आहे? तारामतीचें मन जरीं अगदीं निश्चल होतें, तरीं पुत्राचा बाहुपाश कंठांत पडतांच तिच्या अंत:करणानें एकदम झळंब घेतली. तिणें पुत्रास मांडांवर घेऊन त्याचें मुख कुरवाळलें, केश सावरले, अश्रु पुसले, चुंबन घेतलें आणि त्याच्या मुखाकडे पहात अगदीं मोकळ्या गळ्यानें रडण्यास प्रारंभ केला. कांहीं वेळ शोक केल्यानंतर पुन:तिच्या अंत:करणांत विवेकानें प्रवेश करून तिला शुद्धीवर आणतांच तिणें शोक आटपून पुत्राचें समाधान करण्यास प्रारंभ केला.—

### पद

**मिथ्या हा संसार, बाळा मिथ्या हा संसार ॥ध्रु॥ अहंकृतीला वश ना व्हावें, ध्यावें चित्सुखसार ॥ बाळा ० ॥ १ ॥ सुखदु:खातें नगणुनि किमपि, व्हावें भवाब्धिपार ॥बा०॥२॥ दृश्यवस्तु त्या नश्वर निश्चित, माना त्या नि:सार ॥बा०॥३॥सर्वांभूतीं भगवद्भावन, करणें हाची थार॥बाळा०॥४॥**

तारामतीचें हें भाषण ऐकतांच रोहिताचें मन द्विधा झालें.दु:खोद्गारांनीं वारंवार रडूं येई, पण लागलेंच वरील बोधाचें स्मरण होई;याचा विचार करून मन किंचित् शांत होते न होतें तों लागलेंच दु:खाचें स्मरण होऊन हुंदका येई. अशा स्थितींत त्या अज्ञान बालकास आणि घाबरल्याप्रमाणें तारामतीस पहातांच कालकौशिकाचा कंठ सद्गदित झाला. त्याला या राजकुटुंबाच्या नैष्ठिकपणाबद्दल विलक्षण आश्चर्य वाटून या मुलास घेऊन या दोघांचें ऐक्य करावें, असा त्याणें निश्चय केला. त्याणें ही गोष्ट तात्काल तारामतीस सांगितली; मग तिच्या आनंदास काय पारावार आहे? तिणें अनन्यभावानें ऋषीस नमस्कार करून त्याचे अनेक वेळां उपकार मानिले. रोहितासही मोठा आनंद होऊन त्याणें साष्टांगनम-

स्कार करून उपकार आठविले. कालकौशिकानें उभयतांसही बरोबर घेऊन विश्वामित्राकडे आला. प्रारंभीं तर त्याणें "तारामती तुमच्या उपयोगाची नसेल ह्मणून आलांना? मला पूर्वींच ठाऊक होतें! कोणीकडची पीडा माझ्या कपाळीं आली आहे, परमेश्वरास ठाऊक." असें नानाप्रकारांनीं कालकौशिकास ह्मटलें, पण त्यापासून कालकौशिकास वाईट वाटून त्याणें जेव्हां रोहिताचें मोल विचारलें, तेव्हा त्याच्या तोंडाची टकळी बंद झाली. असो, विश्वामित्रानें रोहिताचें मोल 'एक कोट मोहरा' ह्मणून सांगितल्याबरोबर देऊन तारामति आणि रोहित यांसह कालकौशिक आपल्या आश्रमाप्रत जाता झाला.*

कर्माची गति अचाट, तें एकदा फिरलें, ह्मणजे मनुष्यास पाहिजे तशा पीडा देत असतें. खरोखर ह्मटलें तर तारामतीची इतका वेळ ऐकिलेली अवस्था होईल असें कोणाच्या ध्यानीं मनीं स्वप्नीं तरीं होतें काय. बरें, इतक्यावरच तरी थांबलें काय? नाहीं, पुढच्या अपेष्टा तर वाचकाकाच्यानें वाचवणारही नाहींत. असो, तारामती आणि रोहित आनंदानें कालकौशिकाच्या घरीं असतां एके दिवशीं इतर ऋषिशिष्य समिधा पुष्पें आणण्या करितां जात असतां त्यांजबरोबर रोहितही गेला आणि सर्पदंश होऊन मृत्यु पावला. वाचकहो, ही वार्ता ऐकून तारामतीची काय बरें दशा झाली असेल? मुलांनीं ही दुष्ट वार्ता सांगताच साध्वीनें धाडकन भूमीवर आंग टाकलें. तिला आपपर शुद्धीच राहिली नाहीं. पाहिजे तो पदार्थ कवटाळून "बाळा रोहिता!" ह्मणून हाक मारावी. असा कांहीं वेळ शोक केल्यानंतर ऋषीच्या आज्ञेनें एक ऋषिकुमार बरोबर घेऊन पुत्राचें प्रेत पाहावयास निघाली. रात्र काळोखी, मार्ग तर मुळींच नाहीं आणि अतिशय दुःखामुळें निःशक्तता, इतक्या गोष्टी एकत्र झाल्यावर मग तारामतीचें दुःख

* इकडे हरिश्चंद्रास वीरबाहु नावाच्या डोंबानें विकत घेतलें. प्रारंभीं त्याणें यास गृहकृत्यास लावलें, दळण, पाणी वगैरे घरगुती कोणतेंही काम त्याच्या हातून होत नाहींसें पाहून त्याला स्मशानावर रखवाळी करितां नेमिलें. प्रत्येक चुकीस डोंबीण हरिश्चंद्रास मारीत असे.

काय पहावें! हर हर ! विधात्या, तुझी गती अतर्क्य आहे. वारंवार कांटे मोडून तिचीं पावलें इतकीं रक्तबंबाळ झालीं होतीं कीं त्यांच्या सारख्या प्रतिमा वठत आल्या होत्या. एकादे वेळीं चालतां चालतां एकादी खांच पुढें येऊन तिजमध्यें पडे, एकादे वेळीं एकादा वृक्ष किंवा धोंडा पुढें येऊन त्याजवर ही आपटे. अशी व्यवस्था चालली असतां एक प्रेत तिच्या पायास लागलें. तिनें तत्काळ खालीं बसून पाहिलें तों आपल्याच पुत्राचें हें प्रेत अशी तिची खात्री होऊन "बाळा," म्हणून मोठ्यानें हंबरडा फोडून तिणें त्या प्रेतास मिठी मारिली आणि मोकळ्या गळ्यानें विलाप करूं लागली.

## दिंड्या.

**धांव बाळा सत्पथाचारधीरा, धांव रविवंशा राखिवा उदारा ॥ धाव धांवेवा तवमाय रडे धाय, कसा निष्ठुर रे होसि विधे हाय ॥ १ ॥ कशी अवडली भूमिका तुलारे, कसा रणधीरा मसी रूसलारे, कांहीं नाहीं किंतु हा मनीं आला ? कसा मजवांचुन काल तुझा झाला ॥ २ ॥ दीन मातेचा मोह कसा गेला ? कसा स्वर्पंथीं मार्ग उघगला ? ॥ काय रविच्या वंश छेदियेला ? दुष्ट धात्या निःपात तुझा झाला ॥ ३ ॥**

असा विलाप करीत मस्तक व हृदय पिटित बसली आहे, इतक्यांत एक वृद्ध ब्राह्मण येऊन त्याणें 'कां रडअेस' म्हणून तारामतीस प्रश्न केला. सर्वांस माहित आहे कीं, दुःख सांगण्याच्या प्रसंगीं प्रथमारंभीचें स्वरूप येत असतें, त्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें विचारतांच तारामतीनें गुरासारखा आक्रोश मांडिला. तिचा आक्रोश आणि मस्तक व ऊर पिटण्याचे शब्द ईहींकरून सर्व अरण्य नादावून गेलें. असो, असा कांहीं वेळ गेल्या नंतर ब्राह्मणानें पुनः प्रश्न केला, तेव्हां तारामतीनें आपला साद्यंत इतिहास सांगितला. तो ऐकतांच ब्राह्मणानें 'देवा, घात केलासरे घात केलास' म्हणून मोठ्यानें हंबरडा फोडून म्हणाला; "बाई तारामति, हरिश्चंद्रा-

करितांच हो या अरण्यांत तपश्चर्या करित बसलों, हरिश्चंद्रास राज्याभिषेक झालेला पाहून रोहित युवराजा पाहीन आणि सर्व जनास सौख्य मिळेल, अशी फार आशा होती, पण देवा, आज सारीच नाहींशी केलीस! असो, आम्हा आश्रित लोकांचें प्रारब्ध! तेथें दुसऱ्याचा काय उपाय!" असा विलाप करून तारामतीस ह्मणाला; "बाई तारामति, अतां काय करायचें? प्रारब्धीं असेल तेंतें भोगिलें पाहिजे. आतां दुःखांत सुख एवढेंच कीं, ईश्वरानें मलाही येथें आणून सोडिलें. आपण दोघेही कफल्लक, येथल्या डोंबांचा कर फार आहे, आणि तितका दिल्यावांचून कांहीं दहन होणार नाहीं. अंत्यजाला कोठली दया येणार? तर आतां स्मशानांत सामसूम आहे, तों पुढचें कृत्य आटपून घेऊं. महाराज, हरिश्चंद्रावर असा प्रसंग आल्यानेंच मी रानोमाळ हिंडतों आहें" याप्रकारें करून ब्राह्मणाचें मानभावी काव्याचें भाषण ऐकून तारामतीस भरवसा वाटून तिणें त्याच्या बोलण्यास आनुमोदन दिलें. ब्राह्मणानें तत्काल काष्ठें जमवून प्रेत स्मशानांत घेऊन गेला आणि तारामतीच्या हस्तेंकरून यथाविधि त्यास अग्नि देववून आपण स्नान करण्याच्या निमित्तानें तारामतीस तेथेंच बसवून निघून गेला. पुनः तारामती पुत्राच्या चितेपाशीं बसून विलाप करूं लागली. इकडे त्या मानभावी ब्राह्मणानें हरिश्चंद्रास जागृतकरून प्रेत दाखविलें. तें पहातांच त्याणें धावत येऊन लातेनें चिता उडवून दिली आणि तारामतीची वेणी धरून तिला मारूं लागला. अहाहा! असें झाल्यावर तारामतीच्या दुःखास काय पार आहे? तिणें आपणास स्पर्श केल्याबद्दल हरिश्चंद्राची निर्भर्त्सना करून मुक्तकंठानें विलाप करूं लागली.

"परमेश्वरा, सूर्यवंशामध्यें अग्रेसर अशा सत्पुरुष हरिश्चंद्राची भार्या, आज यःकश्चित अंत्यजाच्या हातून विडंबित व्हावी काय! ज्याच्या पायीं संपूर्ण मांडलिकांचे मुकुट पडत होते, ज्याच्या नाम कीर्तीपासून साधुजनाला आनंद व्हावा, दुष्टांना भीति वाटावी, ज्याचें सद्धार्मिकत्व पाहून इंद्रादि देवांनीही माना डोलवाव्या, अशा

पुण्यश्लोक हरिश्चंद्राच्या आत्मप्रभ रोहित पुत्रास यःकश्चित् डोंबानें लातेनें उडवावें काय! जगदुद्धारा, तुझी माया अगाध आहे. या सर्व दुःखाबद्दल आमचा कांहीं तरी अपराध असेल हें खरें, पण तो आह्माला समजाऊन तरी दे !!!" तारामतीचा हा विलाप ऐकतांच "आपला पुत्र मरण पावला व त्याचेंच प्रेत आपण चितेंतून उडवून दिलें" अशी खात्री होऊन हरिश्चंद्रही विलाप करूं लागला. तें पाहून तारामतीस परम आश्चर्य वाटलें, ती ह्मणाली; "परमेश्वरा, माझ्या दुःखाबद्दल अति नीच, कठोर, दुष्ट अशा डोंबासही कळवळा आला, पण अद्यापि तूं मौनच पहात आहेस. बरें बाबा, आतां जी जी इच्छा असेल, ती ती पुरवून घेऊन समाधान मान ह्मणजे झालें." तारामतीचें हें वाक्य ऐकून हरिश्चंद्रास अतिशय वाईट वाटलें. त्याणें एकदम तारामतीच्या कंठास मिठी मारून शोकास प्रारंभ केला.—

## साक्या.

हा परमेशा दीनोद्धारा, काय करिसि हें देवा ॥ सांगे कोठें चुकलों करितां सन्मार्गें त्वत्सेवा ॥ १ ॥ जा बाळातें बहूपचारीं आजवरी भूषविलें ॥ त्याची रविकुल मुकुटमणीचें शव म्या अजि उडवीलें ॥ २ ॥ सोड कल्पना तोचि दुष्ट हा, यदर्थ तुझा कष्ट ॥ झाले नामें हरिश्चंद्र नृप, संप्रति वैरी स्पष्ट ॥ ३ ॥ अंकित आहें गे डोंबाचा रक्षक या मसणाचा ॥ अज्ञाणुनी हें कर्म जाहलें, प्रभाव दुर्भाग्याच्या ॥ ४ ॥ आतां शोका सोड सुंदरी भावी न चुके कोणा ॥ नश्वर अवघें जग हें मानुन, आठवि त्रिभुवन राणा ॥ ५ ॥ स्वामीपाशीं आज्ञा मागुन, येतों दाघदहनाची ॥ तों वरि राहे पतिव्रते गे शांति करुन मनाची ॥ ६ ॥ भगवन् विश्वंभर वचना, सांभाळी कर बहु छलना ॥ ध्रु० ॥

याप्रमाणें भार्येचें समाधान करून हरिश्चंद्र निघून गेला. तारामतीसही पतीची भेट झाल्यामुळें बराच आनंद झाला आणि

ती ईश्वरचिंतन करीत ... आहे, तों पूर्वीचा ब्राह्मण पुन: आला, आणि मोठ्या दीन स्वरानें बोलूं लागला, "परमेश्वरा, तुला येथेंहि दया आली नाहीं काय? अरे, ज्या राजपुत्राकडे पहाण्यास सूर्यासही भय वाटत होतें, त्या राजपुत्रास मरण येऊन त्याच्या प्रेताची अशी दुर्दशा व्हावी काय! असो, बाई तारामति, हरिश्चंद्र महाराज येइतपर्यंत प्रेतासह आपण या जगदंबेच्या देवालयांत बसूं. कदाचित् पिशाचांचा त्रास होण्याचाही संभव आहे. करावयाचें काय? प्रारब्धीं असेल तसतसें भोगिलें पाहिजे." ब्राह्मणाचा दुष्टभाव, साध्वीला ठाऊक नसल्यामुळें तिणें त्याच्या ह्मणण्यास रुकार दिला आणि प्रेतासह ब्राह्मणाबरोबर देवीच्या देवालयांत गेली.

ब्राह्मण हे नांव **भूतदया, सदाचार, ईश्वरज्ञान,** इत्यादि अनेक सद्गुणांवरून पडलें आहे, पण या राजकुटुंबाचा छल करणाऱ्या ब्राह्मणास भूतदयेची ओळख देखील नव्हती, असें स्पष्ट ह्मणावें लागतें. तारामतीस दुःखातिशयामुळें निद्रा लागलीसें पाहून त्या दुष्ट व निर्दय ब्राह्मणानें त्या सुकुमार बालाच्या प्रेताचीं आतडीं काढून तिच्या गळ्यांत घातलीं व "लावरे लाव" ह्मणून शंखध्वनि करीत रस्त्यानें धावूं लागला. पंचोषःकालचा समय असल्यामुळें तत्काल लोकांचा मेळा जमला. त्या सर्वांस या ब्राह्मणानें "मुलें खाणारी **लांव** ती ही" ह्मणून सांगतांच संपूर्ण लोकांनीं तारामतीची हेलना चालविली. कोणी दगड मारी, कोणी माती फेंकी, कोणी शिव्या देई, असा कहर चालला आहे तों सूर्योदय झाला. नंतर संपूर्ण लोकांनीं तारामतीस ओढीत राजसभेंत नेलें. राजानें लावेविषयीं सर्व मजकुर ऐकतांच शिरच्छेदाचा हुकूम केला. कोतवालानें डोंबास शिरच्छेद करावयास सांगतांच डोंबानें ती कामगिरी हरिश्चंद्रास सांगितली. वाचकहो, प्रत्यक्ष भार्येचा आणि तोही अपराधावांचून वध करण्यास कोणत्या नरें पुरुषाचें धैर्य होईल? परंतु हरिश्चंद्राच्या एकनिष्ठमनास कांडी इतकाही मोह प्राप्त झाला नाहीं. त्याणें तत्काल तारामतीस भागीरथीवर नेऊन स्नान करण्यास

सांगतलें व अनन्यभावानें परमेश्वराची प्रार्थना करण्यास सांगून स्वतःही परमेश्वराची प्रार्थना केली आणि आतां तिच्या कंठावर शस्त्र टाकणार, इतक्यांत अंतरिक्षांतून असें तेज पसरलें कीं, सर्व लोकांचे नेत्र एकदम दिपून गेले. तेजाबद्दल लोक आश्चर्य करीत आहेत, तों साक्षात् वैकुंठवासी भगवान् चतुर्भुज, पीतांबरधारी हरिश्चंद्रापुढें उभा राहून त्याणें हरिश्चंद्राचा हात धरून इच्छा विचारतो आहे, असें पहातांच सर्व लोकांस एकदम पश्चात्ताप होऊन त्यांणीं या उभयतांस दंडवतें घातलीं. हरिश्चंद्र व तारामती यांणीं परमेश्वराची अनेक प्रकारें स्तुति करून शेवटीं तारामतीनें हा आशीर्वाद मागितला.—

श्लोक

**व्हावें जन्म असेंच क्षत्रियकुळीं भर्ता असाची मिळो,**
**रोहीदासपरी सुपुत्र बहुशां कष्टां विवेकें गिळो ॥ वि**
**श्वामित्र समान याचक भसो सद्बुद्धि धर्मांवनीं, अंतीं**
**येउत पाउलें नयांनं भो हीचो असे मागणी ॥ १ ॥**

तारामतीची ही प्रार्थना ऐकतांच "तथास्तु" ह्मणून परमेश्वर अंतर्धान पावला. इतक्यांत एक्या हातीं रोहितास धरून मुखानें उभयतांची स्तुति करीत विश्वामित्र, हस्त बांधून प्रार्थना करीत राजा व नागरिक आणि प्रत्यक्ष रूपानें यमधर्म+ व शंकर प्राप्त झाले. विश्वामित्रानें इंद्रसभेंत वसिष्ठाबरोबर प्रतिज्ञा केल्याप्रमाणें सर्व तपाचें फल राजास समर्पित केलें. काशी राजानें हरिश्चंद्राचा उत्तम सत्कार करून वार्षिक करभार देण्याचें कबूल केलें. आणि सैन्य, वस्त्रालंकारांसह अयोध्येस जाण्याची तयारी करून दिली. विश्वामित्रानें राजाबरोबर अयोध्येस जाऊन सर्व लोकांसमक्ष स्वहस्तानें त्यास राज्याभिषेक केला आणि पुढें सर्व लोकांसह हरिश्चंद्र तारामती सुखोपभोग घेऊन अंतीं सायुज्य* पदाप्रत जातीं झालीं.

---

+ राजाच्या रक्षणासाठीं यमधर्म डोंब व शंकर काळकौशिक झाला होता अशी कथा आहे.

* हरिश्चंद्राबरोबर, रुक्मांगदाबरोबर आणि रामाबरोबर अयोध्येंतील डोंब सात मुक्तीस गेलें अशी कथा आहे.